K. K. Wagh Education Society's

**K. K. Wagh College of Agriculture,**

(Affiliated to Mahatma Phule Krishi Vidyapeeth, Rahuri)

Saraswati Nagar, Panchavati, Nashik- 422 003. Maharashtra

**College Code;11135** **AISHE Code: C-50690**

☎.:(0253)2555221, 2555224 - principal-bscagri@kkwagh.edu.in https://agri-bsc.kkwagh.edu.in

# गांवकरी

## चिंचखेड येथे कृषिकन्यांचे आगमन



**दिंडोरी : प्रतिनिधी**

चिंचखेड येथे के. के. वाघ महाविद्यालयाच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थिनी ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव व कृषी औद्योगिक अंतर्गत चिंचखेड येथे दाखल झाल्या असून, ग्रामपंचायतीच्या वतिने त्यांचे स्वागत करण्यात आले. यामध्ये कृषिकन्या गायत्री जाधव, प्राची गुंजाळ, भारती खैरनार, प्राजक्ता जगताप, यशस्विनी कुवर, प्रियांका कांदळकर, श्रद्धा खैरनार यांचा समावेश असून, त्या तीन महिने शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. शेतकऱ्यांसाठी विविध कार्यक्रम व प्रात्यक्षिके दाखविणार आहेत. त्यात माती व पाणी परीक्षण, विविध पिकांचे लागवड तंत्रज्ञान, पिकांवर येणारे रोग व कीड यांची माहिती व व्यवस्थापन, जनावरांची काळजी व संगोपन शेतीशी निगडित विविध समस्यांचे निराकरण, बीजप्रक्रिया या विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत. याप्रसंगी सरपंच संगीता सुभाष मातेरे, ग्रामसेवक नानासाहेब तांबे, शिवानंद संधान, पोलीसपाटील ज्ञानेश्वर सोनावणे व ग्रामस्थ संजय मातेरे, भाऊसाहेब पाटील, कैलास मातेरे, नवनाथ डुमणे, योगेश मेधने, तुषार झेंडफळे, अनिल संधान, खंडेराव फुकट, रावसाहेब मेधने, संतोष वाळके उपस्थित होते. या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, अजिंक्य वाघ, संचालक, जनसंपर्क, प्रा. के. एस. बंदी, सचिव, संस्थेचे विश्वस्त अशोक मर्चंट, चांगदेवराव होळकर, विश्वस्त व प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, डॉ. एस. एस. साने, शकुंतलाताई वाघ, डॉ. व्ही. एस. माने, एस. जी. ठाकरे, डॉ. प्रीती भामरे व कॅम्पस समन्वयक डॉ. व्हि. एम. सेवलीकर व प्राचार्य डॉ. एस. एम. हाडोळे, प्रा. परमेश्वरी पवार, प्रा. हेमंत पाटील, प्रा. सुश्मिता काळे, प्रा. ज्योती मोटे यांचे मार्गदर्शन लाभले.

**News of RAWE Activity published in daily Newspaper**

शनिवार, दि. १३ जानेवारी २०२४ अग्रलेख

## पिंपळणारे येथे राहुरी विद्यापीठ अंतर्गत कृषी महाविद्यालयाच्या कृषिदूतांचे आगमन




निफाड (अग्रलेख वृत्तसेवा) - पिंपळणारे तालुका चांदवड येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी अंतर्गत नाशिक येथील के. के. वाघ कृषी महाविद्यालयच्या कृषीदूतांचे आगमन झाले. ग्रामीण कृषी जागरुकता आणि कृषी औदयोगिक कार्यानुभव कार्यक्रम सन २०२३-२४ या वर्षी कार्यक्रम आयोजित केला आहे. के.के. वाघ कृषी महाविद्यालयाच्या माध्यमातून ग्रमीण कृषी जागरूकता हा कार्यक्रम कृषिदूत राबवणार आहेत. शेती पिकाच्या दृष्टीन येणाऱ्या समस्या, त्यावर उपाय योजना तसेच जास्त उत्पादन घेण्यासाठी नवीन तंत्रज्ञान उच्च जातीच्या बियांणाचा वापर, फळबाग लागवड आदिंचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. त्यासाठी कृषीदूत म्हणून हर्षल धुमाळ, अनिरुध्द ढमाले, शिवम धारराव, अभिषेक ढोणे, विवेक गरगटे, आदित्य गाडे, कुसाई घिया आदींचा सहभाग असणार आहे. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, अजिंक्य वाघ, संचालक, जनसंपर्क, प्रा. के. एस. बंदी, सचिव, संस्थेचे विश्वस्त अशोक मर्चंट, चांगदेवराव होळकर, विश्वस्त व प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर, डॉ. एस. एस. साने, शकुंतलाताई वाघ, डॉ. व्ही. एस. माने, एस. जी. ठाकरे, डॉ. प्रीती भामरे व कॅम्पस समन्वयक डॉ.व्हि.एम.सेवलीकर व प्राचार्य डॉ. हाडोळे, प्रा. परमेश्वरी पवार, प्रा. हेमंत पाटील, प्रा. सुश्मिता काळे, प्रा. ज्योती मोटे यांचे मार्गदर्शन लाभले. शेतकऱ्यांनी या उपक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषीदूत आणि महाविद्यालयाच्या माध्यमातून करण्यात आले असून याप्रसंगी सरपंच निलेश अशोक आहेर, ग्रामसेवक सागर मोरे तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

**News of RAWE Activity published on dated 13th jan 2024**

K. K. Wagh Education Society's

**K. K. Wagh College of Agriculture,**

(Affiliated to Mahatma Phule Krishi Vidyapeeth, Rahuri)

Saraswati Nagar, Panchavati, Nashik- 422 003. Maharashtra

**College Code;11135** **AISHE Code: C-50690**

.:(0253)2555221, 2555224 - principal-bscagri@kkwagh.edu.in https://agri-bsc.kkwagh.edu.in

## बेहेड येथे कृषिकन्यांचे आगमन

**पालखेड मिरचीचे।** के.के. वाघ महाविद्यालयाच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थिनी ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव व कृषी औद्योगिक अंतर्गत बेहेड येथे दाखल झाल्या असून, ग्रामपंचायतीच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. यामध्ये कृषिकन्या समिक्षा औटी, कल्याणी अहिरे, अंकिता बच्छाव, दिशा बागुल, कल्पना भाडमुखे, सुलोचना बहिरम, श्रावणी भागवत यांचा समावेश असून त्या तीन महिने शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. शेतकऱ्यांसाठी विविध कार्यक्रम व प्रात्याक्षिके दाखविणार आहेत. त्यात माती व पाणी परिक्षण, विविध पिकांचे लागवड तंत्रज्ञान, पिकांवर येणारे रोग व कीड यांची माहिती व व्यवस्थापन, जनावरांची काळजी व संगोपन, शेतीशी निगडित विविध समस्यांचे निराकरण, बीजप्रक्रिया आदी विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत. याप्रसंगी सरपंच गोरख देवकर, उपसरपंच कमल भवर, ग्रामसेवक भालचंद्र तरवारे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, सचिव प्रा.के.एस. बंदी, संस्थेचे विश्वस्त अशोक मर्चंट, चांगदेवराव होळकर, विश्वस्त व प्राचार्य डॉ.के.एन. नांदूरकर, डॉ.एस.एस. साने, शकुंतलाताई वाघ, डॉ.व्ही.एस. माने, एस.जी. ठाकरे, डॉ.प्रीती भामरे व कॅम्पस समन्वयक डॉ.व्ही.एम. सेवलीकर, प्राचार्य डॉ.एस.एम. हाडोळे, प्रा.परमेश्वरी पवार, प्रा.हेमंत पाटील, प्रा.सुश्मिता काळे, प्रा.ज्योती मोटे यांचे मार्गदर्शन लाभले.



Deshdoot Edition
Jan 14, 2024 Page No. 9

**News of RAWE Activity published in daily Newspaper**

लोकनामा



## कृषिकन्यांकडून मधमाशीचे महत्त्व विषद

**लोकनामा प्रतिनिधी** ८/१०/२३

**करंजी खुर्द :** निफाड तालुक्यातील नारायण टेंभी येथे कृषिकन्यांनी मधुमक्षिकापालन, त्यांच्या जाती, प्रजाती व मधुमक्षिकेचे शेती विकासात शेतकऱ्यांसाठी महत्त्व पटवून सांगितले. यावेळी कृषिकन्या भक्ती पुणे, भूमिका पवार, नेहा पाटील, समृद्धी महिंद्रे, पायल मोरे, सपना राव, वैष्णवी रसाळ, प्रणाली पाटील यांनी मधुमक्षिकापालनासंदर्भात सखोल मार्गदर्शन करून शासकीय योजनांसंदर्भात माहिती दिली. तसेच पीक, फळबागा, भाजीपाला फुलोऱ्यात असताना, परागीभवन होण्यासाठी मधुमक्षिका कशा प्रकारे मदत करते, याचीही माहिती शेतकऱ्यांना दिली.

कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, अजिंक्य वाघ, जनसंपर्क संचालक प्रा. के. एस. बंदी, सचिव तथा संस्थेचे विश्वस्त अशोक मर्चंट, चांगदेवराव होळकर, विश्वस्त व प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, डॉ. एस. एस. साने, शकुंतलाताई वाघ, डॉ. व्ही. एस. माने, एस. जी. ठाकरे, डॉ. प्रीती भामरे व कॅम्पस समन्वयक डॉ. व्ही. एम. सेवलीकर व प्राचार्य डॉ. एस. एम. हाडोळे, प्रा. परमेश्वरी पवार, डॉ. सायली साळुंखे यांचे मार्गदर्शन लाभले.

**News of RAWE Activity published on Dated 8th Oct 2023**

## कृषिदूतांकडून मधुमक्षिका पालनचे महत्त्व



**पालखेड मिरचीचे।** कुंदेवाडी येथील कृषिदूतांनी मधुमक्षिका पालन व मधुमक्षिकेचे शेतकऱ्यांसाठी महत्त्व शेतकऱ्यांना पटवून सांगितले. यावेळी कृषिदूत अरुण नागरे, तन्मय जगताप, युवराज केदार, सौरभ नाईक, रोहित पाटील, संकेत सदगिर, आदेश शिंदे यांनी मधुमक्षिका पालनासंदर्भात सखोल मार्गदर्शन करून शासकीय योजनांसंदर्भात माहिती दिली. तसेच पीक फुलोऱ्यात असताना परागीभवन होण्यासाठी मधुमक्षिका कशा प्रकारे मदत करते याचीही माहिती शेतकऱ्यांना दिली. मधुमक्षिका पालन करत असताना आपण योग्य प्रकारे नियोजन करून त्यापासून मध गोळा करू शकतो व त्यापासून आपण आर्थिक लाभ घेऊ शकतो याचेही मार्गदर्शन केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.एम. हाडोळे, कार्यक्रम समन्वयक पी.बी. पवार. डॉ.एस.व्ही. साळुंखे, प्रा.डी.आर. पाटील, कीटकशास्त्राचे तज्ज्ञ प्रा.टी.बी. उगले, प्रा.एच.एन. पाटील, प्रा.एम.एस. कुयटे यांचे मार्गदर्शन लाभले.

**News of RAWE Activity published in daily Newspaper**

# महाराष्ट्र 7/12 न्यूज पेपर

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा आवाज

संपादक दिगंबर वडघुले | उप संपादक सागर निकाळे | सहसंपादक,ज्ञानेश्वर सांगळे

## माती परीक्षणाबाबत उंबरखेड येथे मार्गदर्शन.

महाराष्ट्र 7/12 न्यूज पेपर सहसंपादक,✍(9637100608)





**प्रतिनिधी, निफाड**

उंबरखेड.. बदलत्या काळानुसार मातीचे वेळोवेळी परीक्षण होणे गरजेचे आहे मातीत कोणकोणते घटक आहेत हे शेतकऱ्यांनी समजून घेत खताच्या मात्रा दिल्या तर भांडवली खर्च कमी होतो शेतकऱ्यांनी माती परीक्षण करणे गरजेचे असल्याचे सांगत कृषी कन्या साक्षी पाटील, साक्षी शिंदे, जानवी वलवे, माधवी पवार, रेणुका अलबाड, मोहिनी धनवे यांनी उंबरखेड येथे शेतकऱ्यांना माती परीक्षणाची प्रात्यक्षिके सादर केली पिक काढल्यानंतर किंवा पेरणीपूर्वी तसेच रासायनिक खते देण्यापूर्वी किंवा खते दिल्यानंतर तीन महिन्यांनी मातीचा नमुना घ्यावा माती परीक्षणानुसार खत व्यवस्थापन करण्याचा सल्ला देण्यात आला जमिनीमधील कमतरतेवर काय उपाय योजना आहेत यांविषयी त्यांनी मार्गदर्शन केले याप्रसंगी जयराम शिंदे रोहिणी पानसरे, पंडित शिंदे, इंदुबाई शिंदे, ललिता शिंदे, व इतर शेतकरी उपस्थित होतेया कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. समीर वाघ, मा. श्री. अजिंक्य वाघ, संचालक, जनसंपर्क, श्री. प्रा. के. एस. बंदी, सचिव, संस्थेचे विश्वस्त मा. श्री. अशोक मर्चंट, मा. श्री. चांगदेवराव होळकर, विश्वस्त व प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर, डॉ. एस. एस. साने, मा. शकुंतलाताई वाघ, डॉ. व्ही. एस. माने, श्री. एस. जी. ठाकरे, डॉ. प्रीती भामरे व कॅम्पस समन्वयक डॉ. व्हि.एम.सेवलीकर व प्राचार्य डॉ. एस. एम. हाडोळे, प्रा. परमेश्वरी पवार डॉ. सायली साळुंखे. प्रा.पुष्पांजली शिंदे प्रा.एस एस बैरागी यांचे मार्गदर्शन लाभले.

**News of RAWE Activity published in daily Newspaper**

**देशदूत**

**महत्त्वाचे...**

## लोणवाडीत पर्यावरण जनजागृती



**निफाड:** लोणवाडी गावात क.का. वाघ कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी जिल्हा परिषद शाळा, लोणवाडी येथे स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त पर्यावरण जागृती या विषयावर पथनाट्य सादरीकरण करत पर्यावरणाविषयी जनजागृती करण्यात आली. यात विविध प्रदूषणांचे गांभीर्य, त्यांची कारणे व प्रतिबंधक उपाय यांची माहिती ग्रामस्थांना या नाट्याद्वारे देण्यात आली. यास गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शाळेतील विद्यार्थ्यांनाही या नाट्याद्वारे प्रदूषणांच्या दुष्परिणामाबाबत जाणीव करुन देण्यात आली. पथनाट्यात पायल साबळे, भुवनेश्वरी ठाकुर, सिद्धिका सातपुते, मयुरी वाटपाडे, बैष्णवी ताकवणे, हर्षदा शिंदे, श्रेया शेलार यांचा सहभाग होता. कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, अजिंक्य वाघ, प्रा.के.एस. बंदी, संस्थेचे विश्वस्त अशोक मर्चंट, चांगदेवराव होळकर, विश्वस्त व प्राचार्य डॉ.के.एन. नांदूरकर, डॉ.एस.एस. साने, शकुंतला वाघ, डॉ.व्ही.एस. माने, एस.जी. ठाकरे, डॉ.प्रीती भामरे व कॅम्पस समन्वयक डॉ.व्ही.एम. सेवलीकर व प्राचार्य डॉ.एस.एम. हाडोळे, प्रा.परमेश्वरी पवार, डॉ.सायली साळुंखे यांचे मार्गदर्शन लाभले.

Deshdoot Edition
Aug 20, 2023 Page No. 4
Powered by : eReleGo.com

**News of RAWE Activity published on Dated 20th Aug 2023**

## पालखेडला ग्रामीण मूल्यांकन सर्वेक्षण

**पालखेड मिरचीचे ।** क. का. वाघ कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी ग्रामीण कृषी जागरुकता आणि औद्योगिकता प्रशिक्षण कायर्क्रमांतर्गत ग्रामीण मूल्यमापन सर्वेक्षणाचे आयोजन केले. ग्रामीण मूल्यमापन सर्वेक्षण यात गावकऱ्यांच्या सहभागाने विविध मूल्यांकन आराखडे तयार केले. शेतकऱ्यांच्या सक्रिय सहभागाने सोसीअल मॅप, रिसोर्स, मॅप ट्रान्सेक्ट वॉक, टाईमलाईन, ट्रेंड ॲनालिसीस, सिझनॅलिटी कॅलेंडर, मोबिलिटी मॅप इत्यादींचा वापर करून विद्यार्थ्यांनी गावातील विविध अडचणी जाणून घेतल्या. तसेच गावकऱ्यांसमवेत चर्चा करून त्यांचे अभिप्राय घेण्यात आले. विद्यार्थ्यांनी गावचा इतिहास, महत्त्वाच्या घडामोडी-घटना आणि सद्यस्थितीबद्दल माहिती घेतली. गावातील विविध संसाधने आणि सामाजिक संस्थांचे चित्रण करण्यासाठी विविध रंगांची रांगोळी वापरून जमिनीवर सामाजिक-संसाधन नकाशा तयार करण्यात आला. मॅपिंगमुळे गावकऱ्यांनाही रस निर्माण झाला. या सर्वेक्षणाद्वारे विद्यार्थ्यांनी ग्रामीण जीवनात विशेषत: शेतकऱ्यांचे जीवन, त्यांचा शेती व्यवसाय आणि संबंधित अडचणी याविषयी माहिती मिळवली. कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, संचालक अजिंक्य वाघ, प्रा. के. एस. बंदी, अशोक मर्चंट, चांगदेवराव होळकर, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, डॉ. एस. एस. साने, शकुंतला वाघ, डॉ. व्ही. एस. माने, एस. जी. ठाकरे, डॉ. प्रीती भामरे, कॅम्पस समन्वयक डॉ. व्ही.एम.सेवलीकर, प्राचार्य डॉ. एस. एम. हाडोळे, प्रा. परमेश्वरी पवार, प्रा. हेमंत पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.



**News of RAWE Activity published in daily Newspaper.**

K. K. Wagh Education Society's

**K. K. Wagh College of Agriculture,**

(Affiliated to Mahatma Phule Krishi Vidyapeeth, Rahuri)

Saraswati Nagar, Panchavati, Nashik- 422 003. Maharashtra

**College Code;11135** **AISHE Code: C-50690**

☎.:(0253)2555221, 2555224 - principal-bscagri@kkwagh.edu.in https://agri-bsc.kkwagh.edu.in

## कृषिकन्यांकडून विविध स्पर्धा

**निफाड ।** क. का. वाघ कृषी महाविद्यालयातील अंतिम वर्षीय विद्यार्थिनींनी नारायणटेंभी जिल्हा परिषद शाळा, कारसूळ जनता विद्यालयात स्वातंत्र्य दिनानिमित्त पहिली ते दहावीसाठी विविध स्पर्धेचे आयोजन केले. पहिली ते चौथीसाठी चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. 'माझी माती, माझा देश', पाणी अडवा पाणी जिरवा, वृक्षारोपण इत्यादी विषयांवर चिमुकल्यांनी आपल्या कल्पना कागदावर उतरवून या स्पर्धेस भरभरून प्रतिसाद दिला. सातवी ते दहावीसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन केले होते. 'रासायनिक शेती : शाप की वरदान' व भारत एक कृषिप्रधान देश असे विषय होते. कृषी विद्यार्थिनींनी स्पर्धेत प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस वाटप केले. भक्ती पुणे, समृद्धी महिंद्रे, पायल मोरे, नेहा पाटील, प्रणाली पाटील, भूमिका पवार, सपना राव, वैष्णवी रसाळ यांनी नियोजन केले. कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, अजिंक्य वाघ, प्रा.के.एस. बंदी, अशोक मर्चंट, चांगदेवराव होळकर, विश्वस्त व प्राचार्य डॉ.के.एन. नांदूरकर, डॉ.एस.एस. साने, शकुंतला वाघ, डॉ.व्ही.एस. माने, एस.जी. ठाकरे, डॉ.प्रीती भामरे, कॅम्पस समन्वयक डॉ.व्ही.एम. सेवलीकर, प्राचार्य डॉ.एस.एम. हाडोळे, प्रा.परमेश्वरी पवार, डॉ. सायली साळुंखे, प्रा. हेमंत पाटील, प्रा.दीपक पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

**News of RAWE Activity published in daily Newspaper.**

## स्वातंत्र्य दिनानिमित्त कृषी कन्यांकडून विविध स्पर्धांचे आयोजन

**दै.आवाज वृत्तसेवा**

**शरद लोहकरे, लासलगाव/प्रतिनिधी -** क. का. वाघ कृषी महाविद्यालयातील अंतीम वर्षीय विद्यार्थिनींनी जिल्हा परिषद शाळा, नारायण टेंभी आणि जनता विद्यालय, कारसूळ मध्ये ७६ व्या स्वातंत्र्यदिना निमित्त इयत्ता १ ली ते १० वी साठी विविध स्पर्धेचे आयोजन केले. या मध्ये इयत्ता १ ली ते ४ थी साठी चित्रकला स्पर्धा आयोजित केली त्यासाठी माझी माती माझा देश, पाणी अडवा पाणी जिरवा, वृक्षारोपण इत्यादी विषयांवर चिमुकल्यांनी आपल्या कल्पना कागदावर उतरवून या स्पर्धेस भरभरून प्रतिसाद दिला. सुंदर सुंदर अशा कल्पना लहान मुलांनी आपल्या चित्रकलेतून सादर केल्या होत्या. इयत्ता ७ वी ते १० वी साठी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या साठी निबंधाचे विषय १) रासायनिक शेती श्राप की वरदान व २) भारत एक कृषी प्रधान देश असे होते. या मध्ये देखील विद्यार्थ्यांनी उत्तम असा प्रतिसाद दिला. या नंतर कृषी विद्यार्थिनींनी स्पर्धेत प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना बक्षिस वाटप करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. कृषीकन्या भक्ती पुणे, समृद्धी महीन्द्रे, पायल मोरे, नेहा पाटील, प्रणाली पाटील, भुमीका पवार, सपना राव, वैष्णवी रसाळ यामध्ये सामील होत्या. या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, अजिंक्य वाघ, संचालक, जनसंपर्क, प्रा. के. एस. बंदी, सचिव, संस्थेचे विश्वस्त अशोक मर्चंट, चांगदेवराव होळकर, विश्वस्त व प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर, डॉ. एस. एस. साने, शकुंतलाताई वाघ, डॉ. व्ही. एस. माने, एस.जी. ठाकरे, डॉ. प्रीती भामरे व कॅम्पस समन्वयक डॉ. व्हि.एम.सेवलीकर व प्राचार्य डॉ. एस. एम. हाडोळे, प्रा. परमेश्वरी पवार, डॉ. सायली साळुंखे, प्रा. हेमंत पाटील व प्रा. दिपक पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.




**News of RAWE Activity published in daily Newspaper.**

पत्रकार सुरेश गांगुर्डे आपलं महानगर

# के. के. वाघ कृषी महाविद्यालयात ग्रामीण मूल्यांकन सर्वेक्षण

**पिंपळगाव बसवंत** । लोणवाडी गावात के. के. वाघ कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी ग्रामीण कृषि जागरूकता आणि औद्योगिकता प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत ग्रामीण मूल्यमापन सर्वेक्षणाचे आयोजन करण्यात आले.



ग्रामीण मूल्यमापन सर्वेक्षणात गावकऱ्यांच्या सहभागाने विविध मूल्यांकन आराखडे तयार केले.

शेतकऱ्यांच्या सक्रिय सहभागाने सोसीअल मॅप, रिसोर्स, मॅप ट्रान्सेक्ट वॉक, टाइमलाइन, ट्रेंड अँनालीसीस, सीझनॅलिटी कॅलेंडर, मोबिलीटी मॅप इत्यादींचा वापर करून विद्यार्थ्यांनी गावातील विविध अडचणी जाणून घेतल्या. तसेच गावकऱ्यांसमवेत चर्चा करून त्यांचे अभिप्राय घेण्यात आले. विद्यार्थ्यांनी गावाचा इतिहास, महत्त्वाच्या घडामोडी, घटना आणि सद्यस्थितीबद्दल माहिती घेतली. गावातील विविध संसाधने आणि सामाजिक संस्थांचे चित्रण करण्यासाठी विविध रंगाच्या रांगोळी वापरून जमिनीवर सामाजिक-संसाधन नकाशा तयार करण्यात आला. मॅपिंगमुळे गावकऱ्यांनाही रस निर्माण झाला. या सर्वेक्षणाद्वारे, विद्यार्थ्यांनी ग्रामीण जीवनात विशेषत: शेतकऱ्यांचे जीवन, त्याचा शेती व्यवसाय आणि संबंधित अडचणी याविषयी माहिती मिळवली. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, अजिंक्य वाघ, संचालक, जनसंपर्क, प्रा. के. एस. बंदी, सचिव, संस्थेचे विश्वस्त अशोक मर्चंट, चांगदेवराव होळकर, विश्वस्त व प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर, डॉ. एस. एस. साने, शकुंतला वाघ, डॉ. व्ही. एस. माने, एस. जी. ठाकरे, डॉ. प्रीती भामरे, कॅम्पस समन्वयक डॉ. व्हि.एम. सेवलीकर, प्राचार्य डॉ. एस. एम. हाडोळे, प्रा. परमेश्वरी पवार, डॉ. सायली साळुंखे यांचे मार्गदर्शन लाभले.

**News of RAWE Activity published in daily Newspaper.**

# देशदूत

महत्त्वाचे...

## कुंदेवाडी येथे कृषिदूतांचे आगमन



**पालखेड मिरचीचे।** कुंदेवाडी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाअंतर्गत क.का. वाघ कृषी महाविद्यालयाचे कृषिदूत अरुण नागरे, युवराज केदार, तन्मय जगताप, सौरभ नाईक, रोहित पाटील, आदेश शिंदे, संकेत सदगिर यांचे ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव व कृषि औद्योगिक प्रशिक्षण कार्यक्रम २०२३-२४ अभ्यास दौऱ्यानिमित्त कुंदेवाडी येथे आगमन झाले. कुंदेवाडी ग्रामस्थांनी कृषीदूतांचे स्वागत केले. अभ्यास कालावधी चार महिन्यांचा असून यादरम्यान माती परीक्षण, पाणी व्यवस्थापन, कीड व रोग व्यवस्थापन, हंगामाप्रमाणे पीक पद्धती, रासायनिक खतांचा योग्य वापर, पीक संरक्षणाबाबत प्रात्यक्षिक घेतले जातील. यावेळी कुंदेवाडी सरपंच विनोद मोरे, ग्रामसेवक स्वप्नील कुंदे, लासलगाव कृउबा संचालक तथा उपसरपंच वैकुंठ पाटील, कर्मचारी शंकर साठे आदींसह कुंदेवाडी परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्राचार्य डॉ.एस.एम. हाडोळे, कार्यक्रम समन्वयक प्रा.पी.बी. पवार, डॉ.एस.व्ही. साळुंखे, प्रा.एच.एन. पाटील, प्रा.डी.आर. पाटील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत आहे.

**News of RAWE Activity published in daily Newspaper.**

☎.:(0253)2555221, 2555224 - principal-bscagri@kkwagh.edu.in https://agri-bsc.kkwagh.edu.in

# देशदूत

## कृषिदूतांचे आगमन

**पालखेड मिरचीचे।** कुंभारी येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी अंतर्गत नाशिक येथील के.के. वाघ कृषी महाविद्यालयच्या कृषीदूतांचे आगमन झाले. ग्रामीण कृषी जागरूकता आणि कृषी औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रम सन २०२३-२४ या वर्षी कार्यक्रम आयोजित केला आहे. के.के. वाघ कृषी महाविद्यालयाच्या माध्यमातून ग्रामीण कृषी जागरूकता हा कार्यक्रम कृषिदूत राबवणार आहेत. शेती पिकांच्या दृष्टीने येणाऱ्या समस्या, त्यावर उपाय योजना तसेच जास्त उत्पादन घेण्यासाठी नवीन तंत्रज्ञान उच्च जातीच्या बियांणाचा वापर, फळलागवड आदिचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. त्यासाठी कृषीदूत म्हणून तेजस थेटे, सत्यम गोरडे, कृष्णा महाडिक, समर्थ उशीर, ओमकार वाळुंज आदींचा सहभाग असणार आहे. प्राचार्य डॉ.एस.एम. हाडोळे, कार्यक्रम समन्वयक अधिकारी प्रा. परमेश्वरी पवार, कार्यक्रम अधिकारी प्रा.दीपक पाटील व विषय तज्ज्ञ शिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली कृषीदूत काम करणार आहेत. शेतकऱ्यांनी या उपक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषीदूत आणि महाविद्यालयाच्या माध्यमातून करण्यात आले. याप्रसंगी सरपंच राजेंद्र जाधव, ग्रामसेवक भरत कदम तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.



News of RAWE Activity published in daily Newspaper.

# महाराष्ट्र 7/12 न्यूज पेपर

**ज्यांनी दिल बलिदान देशासाठी चला कृतज्ञता व्यक्त करू या तयासाठी -गणेश राऊत (शिवबांचा छावा ) हवेली पुणे**
**==========**



प्रतिनिधि, सोमेश्वर गायकवाड...

कारगिल योद्धा शाहिद महेश अंकुश वांजळे
कोंढवे धावडे :- 15 ऑगस्ट अमृतमहोस्तवी वर्षानिमित्ताने कोंढवे धावडे गावाचा असलेल्या शाहिद महेश अंकुश वांजळे या सुपुत्राला कारगिल युद्धात वीरमरण आले त्यांनी दिलेले देशासाठी योगदान हि एक प्रेरणा आणि समस्त गावकरी वर्गाच्या मनाला चटका लावून गेली.
त्यांचा विसर पडू नये म्हणून त्यांच्या नावे शाहिद महेश वांजळे पतसंस्था हि संस्थापक अनिलजी वांजळे यांनी सुरु करत त्यांच्या स्मुर्ती जतन करून ठेवल्या त्यांच्या या कार्यामुळे शाहिद झालेले महेश वांजळे अजरामर आज ठरले त्यामुळे त्यांच्या प्रतिमेस आज हार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले...
तसेच पुढे देशसेवाचा वारसा टिकून राहावा म्हणून शाहिद महेश वांजळे पतसंस्थेचे संस्थापक अनिल वांजळे यांचे सुपुत्र ऍडव्होकेट सुमित अनिल वांजळे BBA, LLB, LLM या ऑफिसचा उदघाटन सोहळा अनिलजींच्या मातोश्री श्रीमती रखमाबाई विठोबा वांजळे जि.प. सदस्या सौ.अनितताई इंगळे,नगरसेविका सायलीताई वांजळे व भाजपा नेते सुभाषभाऊ नाणेकर यांच्या शुभ हस्ते करण्यात आला...
या वेळी शाहिद महेश वांजळे कारगिल योद्धा त्यांना विनम्र आभिवादन करण्यासाठी कोंढवे धावडे गावातील संस्थापक अनिलजी वांजळे, ज्येष्ठ त्रिम्बक आण्णा मोकाशी, सुभाषभाऊ मोरे, श्रीकांत धावडे,विलास मोरे,शिवाजी धावडे,महादेव धावडे,अशोकभाऊ चौंधे, उमेशभाऊ सरपाटील, माणिकतात्या मोकाशी, रमेशजी धावडे, आप्पा धावडे, जनसेवक गणेश राऊत व इतर सहकारी उपस्तित होते...

**शासनाच्या मेरी मिट्टी मेरा देश या कार्यक्रमाअंतर्गत दावचवाडी गावामध्ये वृक्षारोपन व देश विरांचे धन्यवाद सोहळा पार पडला ,**

शासनाच्या मेरी मिट्टी मेरा देश या



प्रतिनिधी, निफाड

कार्यक्रमाअंतर्गत दावचवाडी गावामध्ये वृक्षारोपन व देश विरांचे धन्यवाद सोहळा पार पडला, मिट्टी को नमन! विरोंको वंदन! कुलदीप पाटील, भावेश पाटील ,कुणाल पडवळ, गौरव नागरे, शुभम पडोळ, तुषार महाजन, स्वप्नील नेतकर ह्या क. का. वाघ कृषी महाविद्यालयाच्या दावचवाडी गावामध्ये वृक्षारोपनास उत्स्फुत सहभाग घेतला, ग्रामपंचायतीच्या वतीने ७५ वृक्ष लावली गेली. गावाचे सरपंच अशोक धुमाळ, उपसरपंच कावेरी शिंदे ग्रामसेवक गणेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली समस्त ग्रामस्थ कार्यरत तसेच विरोंको वंदन म्हणजेच गावातील माजी सैनिक सुधाकर वसंत कुयाटे, उत्तम अंबु कुयाते,संतोष यशवंत कुयते,योगेश भास्करराव शिंदे,कृष्णा रावसाहेब शिंदे यांचे अभिवादन करण्यात अले त्यांस शाल, श्रीफळ गुलाब पुष्प देऊन गौरवण्यात आले .

Your Advertisement

News of RAWE Activity published in daily Newspaper.

K. K. Wagh Education Society's

**K. K. Wagh College of Agriculture,**

(Affiliated to Mahatma Phule Krishi Vidyapeeth, Rahuri)

Saraswati Nagar, Panchavati, Nashik- 422 003. Maharashtra

**College Code;11135** **AISHE Code: C-50690**

☎.:(0253)2555221, 2555224 - principal-bscagri@kkwagh.edu.in https://agri-bsc.kkwagh.edu.in

# NEWS Gallery 2022 -2023

सकाळ



वलखेड : मृदा आरोग्यपत्रिकेबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना वाघ महाविद्यालयाच्या कृषिकन्या.

## 'मृदा आरोग्यपत्रिके'बाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**लखमापूर :** दिंडोरी महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी अंतर्गत ग्रामीण कृषी जागरूकता आणि कृषी औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रमादरम्यान क. का. वाघ कृषी महाविद्यालय, नाशिक येथील कृषिकन्यांनी वलखेड गावात मृदा आरोग्य कार्ड व त्याचे फायदे याचे प्रात्यक्षिकद्वारे शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. मृदा आरोग्य पत्रिकामुळे शेतकऱ्यांना जमिनीचे स्वरूप, मातीचे आरोग्य, मातीची कार्यात्मक वैशिष्ट्य, जमिनीतील पाण्याचे प्रमाण आणि पोषक घटक, मातीचे अतिरिक्त गुण, मातीतील दोष सुधारण्यासाठी उपाय याबाबत माहिती दिली. मृदा आरोग्य कार्ड व त्याचे फायदे या प्रात्यक्षिकद्वारे विद्यार्थिनींनी शेतकऱ्यांना महत्त्व पटवून दिले. कृषिकन्या प्राची पाटील, ऋतुजा मोरे, सेजल निकम, वैष्णवी परदेशी, रचना पाटील, कोमल पवार, नक्षीका सोनकांबळे यांचा सहभाग होता. प्रात्याक्षिकांसाठी त्यांना डॉ. सतीशकुमार हाडोळे,कार्यक्रम अधिकारी प्रा. परमेश्वरी पवार, प्रा. तुषार उगले, प्रा. सुनील बैरागी यांचे मार्गदर्शन लाभले.

Nashik, Sinnar
21/01/2023 Page No. 2

**News of RAWE Activity published in daily Newspaper.**

पोलिसांनी मोरीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

फळभाज्यांची आवक आज ५६८ वर

सामना १८ जानेवारी २०२३

## वलखेडला पिकांवरील तण व्यवस्थापनाचे मार्गदर्शन

वाघ महाविद्यालयातर्फे कृषी जागरूकता कार्यक्रम संपन्न



दिंडोरी, दि. १७ (सा.वा.)- के. के. वाघ कृषी महाविद्यालयाच्या वतीने आयोजित कृषी जागरूकता कार्यक्रमामध्ये कृषीकन्यांनी उपस्थित शेतकऱ्यांना तण व्यवस्थापनाची माहिती दिली.

राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठांतर्गत ग्रामीण कृषी जागरुकता आणि कृषी औद्योगिक कार्यानुभूती कार्यक्रम राबवला जात आहे. याचाच एक भाग म्हणून नाशिकच्या वाघ कृषी महाविद्यालयातील कृषीकन्यांनी वलखेड येथे वेगवेगळ्या रब्बी पिकांमधील तण व्यवस्थापनावर प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन केले. तण व्यवस्थापनाचे सुधारित तंत्रज्ञान विकसित करूनही प्रादुर्भाव अपेक्षेप्रमाणे नियंत्रित करता आलेला नाही. यात प्रामुख्याने रासायनिक खत व पाण्याचा अतिवापर, अधिक उत्पादन देणाऱ्या जातींचा वापर, अधिक प्रमाणात जमिनीची मशागत, एकपीक पद्धतीत द्विदल पिकांचा अंतर्भाव नसणे, हवामान बदल असे अनेक अडथळे ठरतात. यावर मात करण्याचे धडे देण्यात आले.

**News of RAWE Activity published in daily Newspaper.**

K. K. Wagh Education Society's
**K. K. Wagh College of Agriculture,**
(Affiliated to Mahatma Phule Krishi Vidyapeeth, Rahuri)
Saraswati Nagar, Panchavati, Nashik- 422 003. Maharashtra
**College Code;11135** **AISHE Code: C-50690**

☎.:(0253)2555221, 2555224 - principal-bscagri@kkwagh.edu.in https://agri-bsc.kkwagh.edu.in

सामना ३ नाशिक
बुधवार, दि.१८ जानेवारी २०२३

# वलखेडला पिकांवरील तण व्यवस्थापनाचे मार्गदर्शन

## वाघ महाविद्यालयातर्फे कृषी जागरूकता कार्यक्रम संपन्न



दिंडोरी, दि. १७ (सा.वा.)– के. के. वाघ कृषी महाविद्यालयाच्या वतीने आयोजित कृषी जागरूकता कार्यक्रमामध्ये कृषीकन्यांनी उपस्थित शेतकऱ्यांना तण व्यवस्थापनाची माहिती दिली.

राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठांतर्गत ग्रामीण कृषी जागरुकता आणि कृषी औद्योगिक कार्यानुभूती कार्यक्रम राबवला जात आहे. याचाच एक भाग म्हणून नाशिकच्या वाघ कृषी महाविद्यालयातील कृषीकन्यांनी वलखेड येथे वेगवेगळ्या रब्बी पिकांमधील तण व्यवस्थापनावर प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन केले. तण व्यवस्थापनाचे सुधारित तंत्रज्ञान विकसित करूनही प्रादुर्भाव अपेक्षेप्रमाणे नियंत्रित करता आलेला नाही. यात प्रामुख्याने रासायनिक खत व पाण्याचा अतिवापर, अधिक उत्पादन देणाऱ्या जातींचा वापर, अधिक प्रमाणात जमिनीची मशागत, एकपीक पद्धतीत द्विदल पिकांचा अंतर्भाव नसणे, हवामान बदल असे अनेक अडथळे ठरतात. यावर मात करण्याचे धडे देण्यात आले.

**News of RAWE Activity published on Dated 18th Jan2023**

सकाळ



वलखेड : शेतीसाठी डिजिटल तंत्रज्ञानाची शेतकऱ्यांना माहिती देताना कृषिकन्या.

# डिजिटल तंत्रज्ञानावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**दिंडोरी :** आजच्या डिजिटल क्रांतीच्या युगात शेतीक्षेत्र पुढे कसे राहील, शेतीमध्ये आज डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणात वाढता आहे. माहिती व तंत्रज्ञानाने शेती क्षेत्रात मोठी क्रांती घडवून आणली आहे, जमिन तयार करणे, पीककाढणी, मार्केटिंग, प्रोसेसिंगमध्ये अमूलाग्र बदल झाले आहे. त्या पार्श्वभूमीवर वलखेड (ता. दिंडोरी) येथील शेतकऱ्यांना कृषिकन्यांनी मार्गदर्शन केले. कोरोनाच्या संकटात शेतकऱ्यांसोबत संवाद साधण्यासाठी झूम ॲप, यू- ट्यूबसह वेगवेगळे ॲप माध्यम तयार झाले. त्यामुळे शेतकऱ्यांना विविध तंत्रज्ञान, हवामान, पिकांबाबत असणारी माहिती सोप्या पद्धतीने उपलब्ध करता येते. त्याचप्रमाणे वेळही वाचविता येतो. त्यामुळे कृषी क्षेत्रात ॲपचे महत्व किती आहे, हे विद्यार्थिनींनी पटवून दिले. या वेळी कृषिकन्या प्राची पाटील, ऋतुजा मोरे, सेजल निकम, वैष्णवी परदेशी, रचना पाटील, कोमल पवार, नक्षीका सोनकांबळे यांनी सहभाग घेतला. डॉ. सतीशकुमार हाडोळे, प्रा. परमेश्वरी पवार, प्रा. तुषार उगले, प्रा. शितल हुलगुंडे, प्रा. योगेश कदम, प्रा. सायली साळुंखे यांनी कृषिकन्यांना मार्गदर्शन लाभले.

Nashik, Sinnar
12/12/2022 Page No. 2

**News of RAWE Activity published in daily Newspaper.**

देशदूत

## जनावरांसाठी लसीकरण



**वलखेड ।** महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी अंतर्गत ग्रामीण कृषी जागरुकता आणि कृषी औद्योगिक कार्यानुभूत कार्यक्रमादरम्यान कृषी महाविद्यालय, नाशिक येथील कृषीकन्यांनी वलखेडमध्ये जनावरांसाठी लसीकरण मोहीम राबवली. जनावरांना घटसर्प रोगावर प्रतीक बंधात्मक लस देण्यात आली. यावेळी जनावरांच्या इतर लसविषयी शेतकऱ्यांना माहिती देण्यात आली.त्यावेळी शेतकरी निलेश गरध,योगेश प्रधान, रमेश भोई, रुपेश गरध, दिपक भोई, शेतकरी उपस्थित होते. यावेळी तेथे पशुवैद्यकीय डॉ. अंकीत आहेर तेथे उपस्थित होते. त्यांनी लसीकरण विषयी मार्गदर्शन केले. लसीकरण हे जनावरांच्या आरोग्यासाठी महत्त्वाचे आहे. हे शेतकऱ्यांना विद्यार्थ्यांनींनी या प्रात्यक्षिकाद्वारे ते पटवून दिले.त्यात कृषिकन्या प्राची पाटील, ऋतुजा मोरे, सेजल निकम, वैष्णवी परदेशी, रचना पाटील, कोमल पवार, नक्षीका सोनकांबळे याचा सहभाग होता. त्या प्राप्तक्षिकासाठी त्यांना डॉ. सतीशकुमार हाडोळे, कार्यक्रम अधिकारी प्रा. परमेश्वरी पवार, प्रा. तुषार उगले, पशुपालन विभागाचे प्रमुख प्रा. ज्योती मोटे यांचे मार्गदर्शन लाभले.

Deshdoot Edition
Dec 31, 2022 Page No. 2
Powered by : eReleGo.com

**News of RAWE Activity published on Dated 31st Dec 2022**

सकाळ



वलखेड : शेतकऱ्यांना पशुखाद्याविषयी मार्गदर्शन करताना कृषिकन्या.

## पशुखाद्याविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**दिंडोरी :** तालुक्यातील वलखेड येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्न क. का. वाघ कृषि महाविद्यालयाच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनींनी कृषि कार्यानुभव अंतर्गत शेतीविषयक प्रात्यक्षिक सादर केले. यात शेतकऱ्यांना जनावरांचे खाद्य 'मुरघास'विषयी कृषिकन्यांनी मार्गदर्शन केले. जनावरांच्या शरीरातील उर्जा वाढविण्यासाठी, शरीराची वाढ, तंदुरुस्ती व स्वास्थ्यासाठी खाद्याची गरज असते. म्हणून खाद्यात पुरेशी उर्जा व शरीराला लागणारी प्रथिने, क्षार व आवश्यक पोषकतत्त्वांचा समावेश असला पाहिजे. तसेच, पचनक्रिया सुरळीत ठेवण्यासाठी काही घटकही आहारात असावे लागतात. पशुखाद्य वापरल्याने जनावरांच्या स्वास्थ्यामध्ये जलद सुधारणा दिसून येते. पशुखाद्यामधून योग्य व आवश्यक प्रमाणात जनावरांना शरीरासाठी व दुध उत्पादनासाठी प्रथिने देता येतात. रोगप्रतिकार शक्ती वाढते, हे विद्यार्थ्यांनींनी प्रात्यक्षिकांद्वारे पटवून दिले. कृषिकन्या प्राची पाटील, ऋतुजा मोरे, सेजल निकम, वैष्णवी परदेशी, रचना पाटील, कोमल पवार, नक्षीका सोनकांबळे यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. प्राप्तक्षिकासाठी त्यांना डॉ. सतीशकुमार हाडोळे, कार्यक्रम अधिकारी प्रा. परमेश्वरी पवार, प्रा. तुषार उगले, पशुपालन विभागप्रमुख प्रा. ज्योती मोटे यांचे मार्गदर्शन लाभले.

**News of RAWE Activity published in daily Newspaper.**

## बीजप्रक्रियाविषयी मार्गदर्शन



**वलखेड ।** दिंडोरी तालुक्यातील वलखेड येथील शेतकऱ्यांना बीजप्रक्रियाविषयी के. के. वाघ कृषी महाविद्यालयातील कृषिकन्यांनी माहिती दिली. कृषी उत्पादनात पीक संरक्षणास जेवढे महत्व आहे. तेवढेच महत्त्व बीज प्रक्रियेस आहे. परंतु बियाणे प्रक्रियेस जेवढे महत्त्व पिक संरक्षणामध्ये दिले गेले पाहिजे, तेवढे दिले जात नाही. त्यामुळे विद्यार्थिनिनी बीजप्रक्रियेच्या प्रात्यक्षिकाद्वारे ते पटवून दिले. त्यात त्यांनी रासायनिक बुरशीनाशकांची प्रक्रिया म्हणजे 'थायरम' यांचा वापर केला. त्यात कृषिकन्या प्राची पाटील, ऋतुजा मोरे, सेजल निकम, वैष्णवी परदेशी, रचना पाटील, कोमल पवार, नक्षीका सोनकांबळे याचा सहभाग होता. त्या प्राप्रक्षिकासाठी त्यांना डॉ सतीशकुमार हाडोळे, प्रा. परमेश्वरी पवार, प्रा. तुषार उगले, प्रा. प्रियांका ब्रम्हणे यांचे मार्गदर्शन लाभले.

**News of RAWE Activity published in daily Newspaper.**

# देशदूत

## मृदा दिननिमित्त मार्गदर्शन



**वलखेड ।** वाढते जागतिक औदयोगिकीकरण, उद्योगधंदे, जंगलतोड, शहरीकरण, शेतीसाठी वाढता रसायनांचा वापर, इत्यादी गोष्टींमुळे मातीची धूप, ऱ्हास होत आहे. मातीची धूप कमी करण्यासाठी, सुपीक माती, आणि तिच्या संसाधनांबद्दल लोकांमधे जागरुकता निर्माण करण्यासाठी ग्रामीण कृषी जागरुकता कार्यानुभव व कृषी औद्योगिकता प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत क. का. वाघ कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी वलखेड येथे 'जागतिक मृदा दिन' साजरा केला. यावेळी क. का. वाघ कृषी महाविद्यालयाचे किटकशास्त्रतज्ज्ञ तुषार उगले हे वक्ते म्हणून लाभले होते. सरपंच विनायक शिंदे यांच्यासह सदस्य उपस्थित होते. कृषीकन्या प्राची पाटील, ऋतुजा मोरे, सेजल निकम, वैष्णवी परदेशी, रचना पाटील, कोमल पवार, नक्षीका सोनकांबळे यांनी मृदा दिनाचे महत्त्व, मृदेच्या ऱ्हासाची कारणे, उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले. तसेच, तुषार उगलें यांनी शेतकन्यांना मार्गदर्शन केले. त्यांच्या शंकांचे निरसरण केले. कार्यक्रमाला शेतकऱ्यांचा भरघोस प्रतिसाद मिळाला असून त्यांनी विद्यार्थिनींचे आभार मानले.

देशदूत संस्करण
9 दिसंबर, 2022 पृष्ठ संख्या 6
द्वारा संचालित: eReleGo.com

**News of RAWE Activity published on Dated 9 Dec 2022**

सकाळ



वलखेड : अझोलानिर्मितीविषयी मार्गदर्शन करताना कृषिकन्या.

## वलखेडला अझोला निर्मितीवर मार्गदर्शन

दिंडोरी, ता. ७ : जनावरांचे दूध उत्पादन, प्रजनन, वाढ आणि आरोग्याचा विचार करता पशुखाद्यांमध्ये विविध पोषण घटकांचे संतुलित प्रमाण असणे आवश्यक आहे. यासाठी पशुखाद्य म्हणून अझोलाचा वापर फायदेशीर ठरतो. दुग्ध उत्पादकांना अझोला उत्पादनाचे महत्व व फायदे पटवून देण्यासाठी ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव कृषी औद्योगिकता प्रशिक्षण कार्याक्रमांतर्गत क. का. वाघ कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थीनिंनी दिंडोरी तालुक्यातील वलखेड येथे अझोला उत्पादनाचे प्रात्यक्षिक दाखविले. अझोला उत्पादनासाठी लागणारे साहित्य, उत्पादनाची प्रक्रिया समजावून सांगत अझोलाचे पशु दुध वाढीसाठी होणारे फायदे व महत्व पटवून दिले. शेतकऱ्यांनी विद्यार्थीनींचे आभार मानले. कृषिकन्या प्राची पाटील, ऋतुजा मोरे, सेजल निकम, वैष्णवी परदेशी, रचना पाटील, कोमल पवार, नक्षीका सोनकांबळे यांनी प्रात्यक्षिक करून दाखविले.

Nashik, Sinnar
08/12/2022 Page No. 2

**News of RAWE Activity published in daily Newspaper.**

देशदूत

## कृषिकन्यांकडून माती परीक्षणाचे धडे



**वलखेड ।** वलखेड येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संलग्न के. के. वाघ कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी शेतकऱ्यांना मातीपरीक्षणाचे धडे दिले.

कृषिकन्या प्राची पाटील, ऋतुजा मोरे, सेजल निकम, वैष्णवी परदेशी, रचना पाटील, कोमल पवार, नक्षीका सोनकांबळे यांचा सहभाग आहे. त्यांनी शेतकऱ्यांची भेट घेतली व आपल्या कामाबद्दल माहिती दिली. विद्यार्थिनींनी शांताराम शिंदे यांच्या शेतात ग्रामस्यांना बोलावून माती परीक्षणाचे आयोजन केले. प्रात्यक्षिकाद्वारे माती परीक्षणाचे महत्त्व शेतकऱ्यांना पटवून दिले. त्यानंतर विचारलेल्या प्रश्नाचे विद्यार्थिनींनी निवारण केले. कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीशकुमार हाडोळे यांचे मार्गदर्शन लाभले. ग्रामीण कृषी कार्यानुभव व कृषी औद्योगिकता कार्यक्रम अधिकारी प्रा. परमेश्वरी पवार, प्रा. सुनिल बैरागी यांचे मार्गदर्शन लाभले.

**News of RAWE Activity published in daily Newspaper.**

# NEWS Gallery 2021 -2022

नाशिक

५

नाशिक, मंगळवार, ३ ऑगस्ट २०२१

सकाळ अॅग्रोवन

## पिकांमध्ये एकात्मिक कीड व्यवस्थापन महत्त्वाचे : डॉ. संजय पाटील

### पिकांवरील कीड व्यवस्थापनाविषयी ऑनलाइन शेतकरी मेळावा

**अॅग्रोवन वृत्तसेवा**

नाशिक : पिकांमध्ये एकात्मिक कीड व्यवस्थापन महत्त्वाचा भाग आहे. त्यात लागवडीपूर्व उपाययोजनांमध्ये शेताची स्वच्छता, बियाणे निवड, प्रतिकारक जातींचा वापर, पिकांची फेरपालट, बीजप्रक्रिया, आंतरपिके व सापळा पिके यांचा वापर तसेच लागवडीचा वेळी व लागवडीनंतरच्या उपाययोजनांमध्ये खताचा संतुलित वापर, पक्षांना बसण्यासाठी मचान, वनस्पतीजन्य कीटकनाशकांचा वापर, किडलेले भाग नष्ट करणे, जैविक कीडनियंत्रण, कामगंध सापळे व रासायनिक कीडनियंत्रण वापर महत्त्वाचा आहेत. या माध्यमातून एकात्मिक कीड व्यवस्थापन करता येते, असे प्रतिपादन शासकीय कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाचे कीटकशास्त्र विषयाचे डॉ. संजय पाटील यांनी केले.

के. के. वाघ कृषी महाविद्यालयाच्या वतीने ग्रामीण कृषी कार्यानुभव व कृषी औद्योगिकता कार्यक्रमांतर्गत खरीप 'पिकांवरील कीड व्यवस्थापन' या विषयावर ऑनलाइन शेतकरी मेळावा घेण्यात आला. यात शेतकऱ्यांना खरीप तसेच रब्बी पिकांवरील किडींचे व्यवस्थापन कसे करता येईल, याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.

खरीप हंगामात कोणकोणत्या किडींचा प्रादुर्भाव याबाबत माहिती देताना ते म्हणाले, कीटकनाशकांचा कमीत कमी वापर करून जैविक पद्धत, मित्र किडी, कामगंध सापळे, पिवळे व निळे सापळे, फळमाशी सापळे याद्वारे देखील पीक संरक्षण करता येऊ शकते, असे डॉ. पाटील यांनी सांगितले.

शेतकरी मेळाव्यादरम्यान त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे निरसन केले. शंख गोगलगाईचे नियंत्रण पीक संरक्षण मोहिमेद्वारे एकत्रितरीत्या करायला हवे. मका, टोमॅटो, सोयाबीन आदी पिकांवरील पाने खाणाऱ्या अळीचे नियंत्रण हे जैविक पद्धतीने निंबोळी अर्क, कामगंध सापळे यांनी करता येते. रस शोषणाच्या किडी, भुंगा, थ्रीप्स व पांढरी माशी व मावा-तुडतुडेसाठी शिफारशीनुसार फवारण्या घेऊन वापरून चांगल्या प्रकारे नियंत्रण करू शकतो.

ग्रामीण कृषी कार्यानुभव व कृषी औद्योगिकता कार्यक्रम अधिकारी प्रा. परमेश्वरी पवार, प्रा. बैरागी व कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीशकुमार हाडोळे यांचे मार्गदर्शन लाभले. कृषिदूत देवांग सुरुडे, सचिन पानसरे, प्रसाद शिंदे, रोशन घुले, अतुल शिंदे, अक्षय परदेशी व कृषिकन्या सावरी मोरे यांनी आयोजन केले.

सकाळ



मंचर (ता.आंबेगाव) : निंबोळी अर्काचे प्रशिक्षण देताना कृषिकन्या श्वेता मेंगडे.

## निंबोळीच्या अर्काचे मंचरमध्ये प्रात्यक्षिक

**मंचर :** "कडुलिंब झाडाच्या बियांपासून काढलेला अर्क कीटकनाशकासाठी उपयुक्त आहे. मावा, अमेरिकन बोंड आळी, कोबीवरील अळ्या, फळ माशा, लिंबावरील, फुलपाखरे, खोड किडा आदी अनेक किडींवर याचा प्रभाव पडतो," असे नाशिक येथील के. के. वाघ कृषी महाविद्यालयातील कृषिकन्या श्वेता साहेबराव मेंगडे यांनी सांगितले. मंचर (ता. आंबेगाव) येथे श्वेता मेंगडे यांनी निंबोळी अर्काचे प्रात्यक्षिक शेतकऱ्यांसमोर सादर केले. कडुलिंबाच्या झाडांमध्ये असलेले अझाँडीरॅकँटीन कीटकनाशकाचे काम करते, असे श्वेता मेंगडे यांनी सांगितले. यावेळी बाळासाहेब नरसुडे, शरद जाधव, दत्तात्रेय वाळके, मुरलीधर माने, बबन शिवले आदी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. सतीश कुमार हाडोळे, प्रा. परमेश्वरी पवार व प्रा. सुनील बैरागी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

Pune, District-Today
05/08/2021 Page No. 5

सोमवार, दि.२६ जुलै २०२१

पुण्य नगरी





## देलवडी, ता. दौंड येथे तणनाशक फवारणी मार्गदर्शन कार्यशाळा

देलवडी ता. दौंड येथे तणनाशक फवारणी मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न झाली.महात्मा फुले कृषी विद्यापिठ संलग्न के.के वाघ कृषी महाविदयालयातील कृषीदून सिध्देश देसाई यांनी कार्यशाळेचे आयोजन केले होते. देसाई यांनी ग्रामीण कृषी कार्यानुभव आणि कृषी औद्योगिक संलग्नता या कार्यक्रमांतर्गत अभ्यास दौऱ्यात फवारणीचे प्रात्याक्षिक सादर केले.तसेच शेतकऱ्यांना कृतीयुक्त मार्गदर्शन करण्यात आले. कार्यशाळेदरम्यान उपस्थित शेतकऱ्यांना तणनाशक फवारणीचे फायदे तोटे, आधुनिक शेती तंत्रज्ञान , पाण्याने तणनाशक फवारणीची गरज व महत्व, तणनाशक फवारणी काळाची गरज व उपयुक्तता या विषयावर मार्गदर्शन केले. सद्यस्थितीत तणनाशक फवारणीमुळे शेतीमधील मोठ्या प्रमाणात अनावश्यक तणाचा बीमोड करण्यास शेतकऱ्यांना मदत होते या गोष्टीचे महत्व पटवून दिले उपस्थित शेतकऱ्यांनी कृषीदूत देसाई यांना सन्मानित केले. सदर प्रात्याक्षिक कार्यशाळेबाबत देसाई यांना के.के वाघ कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सतिश हाडोळे प्रा.परमेश्वरी पवार व प्रा.सुनिल बैरागी यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. या वेळी शेतकरी सुरेश वाघोले, विजय जावीर, महादेव गायकवाड, सागर वाघोले, मनोज हांडे आदी उपस्थित होते.



## शेतकऱ्यांसाठी माती परीक्षण प्रात्यक्षिके

### के. के. वाघ कृषी महाविद्यालयात आयोजन

**अॅग्रोवन वृत्तसेवा**

नाशिक : ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत के. के. वाघ कृषी महाविद्यालयातील कृषिदूतांतर्फे उंबरखेड (जि. नाशिक) येथेमाती परीक्षण प्रात्याक्षिकाचे आयोजन करण्यात आले.

शेतकऱ्यांमध्ये माती परीक्षणासंबंधी जनजागृती व्हावी, यासाठी उपक्रम राबविण्यात आले आहेत. यामध्ये पिके काढल्यानंतर किंवा पेरणीपूर्वी, रासायनिक खते देण्यापूर्वी किंवा खते दिल्यानंतर ३ महिन्यांनी मातीचा नमुना घ्यावा, माती परीक्षणानुसार खत व्यवस्थापन करावा, असा सल्ला कृषिदूतांनी शेतकऱ्यांना दिला. या बरोबरच शेतातील मातीचे नमुने गोळा करून त्याचे परीक्षण करण्यात आले. मातीमध्ये असणारे घटक,जमिनीचा सामू, मातीचा प्रकार या विषयी शेतकऱ्यांना योग्य ते मार्गदर्शनदेण्यात आले.

सचिन पानसरे, देवांग सुरुडे, प्रसाद शिंदे, रोशनघुले, अतुल शिंदे, अक्षय परदेशी या कृषिदूतांनी मार्गदर्शन केले. या उपक्रमासाठी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीशकुमार हाडोळे, कार्यक्रम अधिकारी प्रा. परमेश्वरी पवार व प्रा. सुनील बैरागी यांचे मार्गदर्शन लाभले.

Nashik, Main
21/07/2021 Page No. 5

K. K. Wagh Education Society's

**K. K. Wagh College of Agriculture,**

(Affiliated to Mahatma Phule Krishi Vidyapeeth, Rahuri)

Saraswati Nagar, Panchavati, Nashik- 422 003. Maharashtra

**College Code;11135** **AISHE Code: C-50690**

☎.:(0253)2555221, 2555224 - principal-bscagri@kkwagh.edu.in https://agri-bsc.kkwagh.edu.in

२ ■ शनिवार, दि. १७ जुलै २०२१

SPOT NEWS



## कुळधरण येथे माती परिक्षण कार्यशाळा संपन्न

▶ कर्जत । वीरभूमी –

महात्मा फुले कृषी विद्यापीठ संलग्न कर्मवीर काकासाहेब वाघ कृषी महाविद्यालयातील कृषीदुत विनय सुपेकर याने ग्रामीण कृषी कार्यानुभव आणि कृषी औद्योगीक संलग्नता या कार्यक्रमांतर्गत अभ्यास दौऱ्यात कर्जत तालुक्यातील कुळधरण येथे माती परिक्षण प्रात्यक्षिक दाखवत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कृषीदुत विनय सुपेकर याने शेतकऱ्यांना माती परिक्षणाचे फायदे, मातीत आढळणारे विविध पोषक घटक व त्यांचे प्रमाण दिवसेंदिवस कसे अबाधित ठेवता येईल यावर सखोल मार्गदर्शन केले. सध्याचा मृदेचा होणारा ऱ्हास व माती परिक्षण शिबिरांची खेडोपाडी असणारी आवश्यकता यावरही त्याने सूतोवाच केले. माती परीक्षण कसे आणि का करावे ? याचे मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी विशेष सहभाग नोंदवीत सुपेकर यांचे अभिनंदन करीत कौतुक केले. विनय सुपेकर यांना क. का. वाघ कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य सतिष हाडोळे प्रा. परमेश्वरी पवार व प्रा. सुनील बैरागी यांचे मार्गदर्शन लाभले.

गांवकरी कर्जत लाईव्ह संपादक प्रा. किरण जगताप



## माती परिक्षण कार्यशाळा संपन्न

कर्जत (गांवकरी प्रतिनिधी) :

महात्मा फुले कृषी विद्यापीठ संलग्न कर्मवीर काकासाहेब वाघ कृषी महाविद्यालयातील कृषीदुत विनय सुपेकर याने ग्रामीण कृषी कार्यानुभव आणि कृषी औद्योगीक संलग्नता या कार्यक्रमांतर्गत अभ्यास दौऱ्यात कर्जत तालुक्यातील कुळधरण येथे माती परिक्षण प्रात्यक्षिक दाखवत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी त्याचे कौतुक करत अभ्यास दौऱ्सठी शुभेच्छा दिल्या. कृषीदुत विनय सुपेकर याने शेतकऱ्यांना माती परिक्षणाचे फायदे, मातीत आढळणारे विविध पोषक घटक व त्यांचे प्रमाण दिवसेंदिवस कसे अबाधित ठेवता येईल यावर सखोल मार्गदर्शन केले. सध्याचा मृदेचा होणारा ऱ्हास व माती परिक्षण शिबिरांची खेडोपाडी असणारी आवश्यकता यावरही त्याने सूतोवाच केले. माती परीक्षण कसे आणि का करावे ? याचे बहुमोल मार्गदर्शन केले. त्याला प्राचार्य सतिष हाडोळे, प्रा. परमेश्वरी पवार व प्रा. सुनील बैरागी यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ | पुणे जिल्हा पुणे, शुक्रवार, ३० जुलै २०२१

## महाळुंगे येथे माती परीक्षण प्रात्यक्षिक

**महाळुंगे पडवळ, ता. २९ :** येथील (ता. आंबेगाव) शेतकऱ्यांना के. के. वाघ कृषी महाविद्यालयातील कृषिकन्या पूजा किशोर बाणखेले यांनी माती परीक्षणाचे प्रात्यक्षिक करून दाखविले. ग्रामीण कृषी कार्यानुभव व औद्योगिक संलग्नता या कार्यक्रमाअंतर्गत या उपक्रम राबविण्यात आला.

येथील शेतकरी हरिभाऊ शंकर सैद यांच्या शेतावर माती परीक्षण प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. रासायनिक खते देण्यापूर्वी तीन महिने आधी मातीचा नमुना, अत्यंत सोप्या पद्धतीने घेण्याची कृती व त्यापासून होणारे फायदे, मातीत असणारे घटक, मातीचा प्रकार, जमिनीचा कस, परीक्षणानुसार घ्यावयाची पिके या विषयी मार्गदर्शन केले. यावेळी पूनम सैद, कांचन सैद, सुनीता सैद, सोनम सैद यांनी विचारलेल्या प्रश्नांना बाणखेले यांच्या शंकांचे निरसण झाले. कार्यक्रमासाठी नियोजन प्राचार्य डॉ.सतीशकुमार हाडोळे, प्रा. परमेश्वरी पवार व प्रा. सुनील बैरागी यांचे मार्गदर्शन लाभले.



**महाळुंगे पडवळ (ता. आंबेगाव) : माती परीक्षणाचे प्रात्यक्षिक करताना कृषिकन्या पूजा किशोर बाणखेले.**

सकाळ



खालचे टेंभे (ता. बागलाण) : येथे बीजप्रक्रिया प्रात्यक्षिक दाखविताना विद्यार्थी.

## खालचे टेंभे येथे बीजप्रक्रिया प्रात्यक्षिक

**नामपूर :** खालचे टेंभे (ता. बागलाण) येथे ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत नाशिक येथील के. के. वाघ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांना बीजप्रक्रिया प्रात्यक्षिक करून दाखविले. त्याला शेतकऱ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. या वेळी बीजप्रक्रियासंदर्भात सविस्तर माहिती देण्यात आली. बियाण्यांच्या खरेदीमधून शेतकऱ्यांची अनेकदा फसवणूक होते. शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. त्यामुळे शेतकऱ्यांना बीजप्रक्रिया वरदान ठरते. या वेळी प्राचार्य डॉ. सतीशकुमार हाडोळे, कार्यक्रम अधिकारी प्रा. परमेश्वरी पवार, प्रा. सुनील बैरागी यांचे मार्गदर्शन लाभले.

Nashik, Malegaon
25/07/2021 Page No. 2

K. K. Wagh Education Society's
**K. K. Wagh College of Agriculture,**
(Affiliated to Mahatma Phule Krishi Vidyapeeth, Rahuri)
Saraswati Nagar, Panchavati, Nashik- 422 003. Maharashtra
**College Code;11135** **AISHE Code: C-50690**
☎.:(0253)2555221, 2555224 - principal-bscagri@kkwagh.edu.in https://agri-bsc.kkwagh.edu.in

# NEWS Gallery 2020 -2021

पुण्यनगरी

## कृषीकन्याचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**ढवळगाव :** महात्मा फुले कृषी विद्यापीठाअंतर्गत नाशिक येथील क.का.वाघ महाविद्यालयातील कृषिकन्या ज्ञानदा दादा दिवटे हिचे कृषी आधारित उद्योग उपक्रम आणि औद्योगिक कार्यानुभव २०२०,२१च्या अभ्यास दौऱ्यानिमित्ताने श्रीगोंदा तालुक्यातील आरणगाव दुमाला येथे शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. गावच्या सरपंच जमुना सातव व ग्रामस्थांनी दिवटे हिचे स्वागत केले.

सध्या कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव वाढत असल्याने महाविद्यालयीन विद्यार्थी हा उपक्रम ऑनलाइन पध्दतीने व शेतकऱ्यांच्या निवासस्थानजवळ शेतकऱ्यांसमवेत राबवत आहेत कृषिकन्या ज्ञानदा दिवटे हिने पांडुरंग दिवटे यांना शेतीविषयक अनुभव, आधुनिक शेती व शास्त्रीय पध्दतीने माहिती देऊन मार्गदर्शन केले.

**News of RAWE Activity published in daily Newspaper.**

## अभ्यास दौऱ्यानिमित्त अरणगाव येथे शेतकऱ्यांना मार्गदर्शन



अरणगाव दुमाला येथे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतांना कृषिकन्या ज्ञानदा दिवटे.

**विसापूर सिटीझन प्रतिनिधी–** महात्मा फुले कृषी विद्यापीठाअंतर्गत नाशिक येथील कर्मवीर काकासाहेब वाघ महाविद्यालयातील कृषिकन्या ज्ञानदा दादा दिवटे हिचे कृषी आधारित उद्योग उपक्रम आणि औद्योगिक कार्यानुभव २०२० - २१च्या अभ्यास दौऱ्यानिमित्ताने श्रीगोंदा तालुक्यातील आरण-गाव दुमाला येथे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले गावच्या सरपंच जमुना सातव व ग्रामस्थांनी दिवटे हिचे स्वागत केले सध्या कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव वाढत असल्याने महाविद्यालयीन विद्यार्थी हा उपक्रम ऑनलाइन पध्दतीने व शेतकऱ्यांच्या निव-ासस्थानजवळ शेतकऱ्यांसमवेत राबवत आहेत कृषिकन्या ज्ञानदा दिवटे हिने पांडुरंग दिवटे यांना शेतीविषयक अनुभव, आधुनिक शेती व शास्त्रीय पध्दतीने माहिती देऊन मार्गदर्शन केले.

सध्या कोरोना महामारी चालू असल्याने कृषिकन्या दिवटे हिने शेतकऱ्यांना सुरक्षिततेचे उपाय, सामाजिक अंतर , बाजारपेठेत गेल्यावर घ्यावयाची काळजी याविषयी मार्गदर्शन केले कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हाडोळे सर , तुषार उगले , कोरडे सर व परमेश्वरी पवार यांचे मार्गदर्शन लाभले.

**News of RAWE Activity published in daily Newspaper.**

K. K. Wagh Education Society's
**K. K. Wagh College of Agriculture,**
(Affiliated to Mahatma Phule Krishi Vidyapeeth, Rahuri)
Saraswati Nagar, Panchavati, Nashik- 422 003. Maharashtra
**College Code;11135** **AISHE Code: C-50690**

.:(0253)2555221, 2555224 - principal-bscagri@kkwagh.edu.in https://agri-bsc.kkwagh.edu.in



चंपावतीपत्र

**कृषीदूतांचे शेतकऱ्यांना गांडूळ खताविषयी मार्गदर्शन**

जामखेड । वार्ताहार

रासायनिक खताच्या अतिरिक्त वापरामुळे शेती नापीक होत चालली आहे. त्यामुळे गांडूळ खत शेतीची सुपिकता वाढविण्यासाठी व पिकांसाठी कसे उपयोगी आहे व घरच्या घरी टाकाऊ पदार्थांपासून खत कसे बनवता येते व ते व्यापारी तत्त्वावर बनवून आपण फायदाही मिळवू शकतो यांचे प्रात्यक्षिक कृषी दूत ऋषिकेश पाटील व श्रेयश राऊत यांनी तालुक्यातील साकत परिसरातील शेतकऱ्यांना करून दाखवले. महात्मा फुले कृषी विद्यापीठ अंतर्गत कर्मवीर काकासाहेब वाघ कृषी महाविद्यालय नाशिक येथील कृषीदूत ऋषिकेश पाटील व श्रेयश राऊत यांनी ग्रामीण कृषी जागरूकता व औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रम २०२० च्या अभ्यास दौऱ्याचे साकत परिसरातील शेतकऱ्यांना गांडूळ खत निर्मिती विषयी मार्गदर्शन केले. या दौऱ्यात कृषीदूत ऋषिकेश पाटील व श्रेयश राऊत यांनी परिसरातील शेतकऱ्यांना शेतीविषयक अनुभव, आधुनिक शेती, शेती शास्त्रीय व व्यापारी पद्धतीने कशी करावी शेतीसाठी गांडूळ खत कसे उपयोगी आहे या खतामुळे जमिनीची सुपिकता वाढते, पिकांना फायदा होतो शेतकरी व्यापारी तत्त्वावर खत निर्माण करू शकतात याबाबत माहिती दिली व शेतकर्यांच्या समस्या जाणून घेतल्या व मार्गदर्शन केले यावेळी परिसरातील शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतिष हाडोळे, प्रा. तुषार उगले, प्रा. विक्रम कोरडे, प्रा. परमेश्वरी पवार तसेच महाविद्यालयातील इतर प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले.

सुदाम वराट जामखेड

**News of RAWE Activity published in daily Newspaper.**



**कृषीदुत स्नेहल ससाणे यांचा आभ्यास दौरा; लांबोटी येथे केले मार्गदर्शन**

मोहोळ, दि. २२ (प्रतिनिधी) : महात्मा फुले कृषी विद्यापीठ आंतर्गत कर्मवीर काकासाहेब वाघ कृषी महाविद्यालय नाशिक येथील कृषीदुत स्नेहल सुनिल ससाणे यानी कृषी जागरूकता व औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रम द्वारे मोहोळ तालुक्यातील लांबोटी येथे शेतकरी बांधवाना मार्गदर्शन केले .कृषी जागरुकता या कार्यक्रमाद्वारे प्रबोधन केले व शेती विषयी माहिती दिली . यावेळी गावचे सरपंच पप्पु कदम ग्रामसेवक एन आर महामुनी यांच्या सह शेतकरी बांधव सोशल डीस्टस ठेऊन उपस्थीत होते . यावेळी उपस्थित सरपंच यानी ससाणे यांचे स्वागत केले. सध्या कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव आसल्याने शेतकरी यांच्या प्रत्यक्ष शेतात जाऊन ससाणे यानी ही प्रात्यक्षिके दाखवली तसेच शेती विषयक आनुभव व समस्या जाणुन घेतल्या व त्यावर उपाय सुचविले . आधुनिक शेती तंत्रज्ञान व बी बियाणांची माहिती दिली जैविक खताचा वापर कसा करावा या विषयी मार्गदर्शन केले . यावेळी शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते . हा कृषी अभ्यास दौरा पुर्ण करण्यासाठी स्नेहल ससाणे याना कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सतिष हाडोळे, प्रा विक्रम कोरडे,प्रा तुषार उगले प्रा परमेश्वरी पवार यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले या कार्यक्रमा आंतर्गत उपयुक्त माहिती मिळाल्याने शेतकरी समाधानी झाले .

**News of RAWE Activity published in daily Newspaper.**

K. K. Wagh Education Society's
**K. K. Wagh College of Agriculture,**
(Affiliated to Mahatma Phule Krishi Vidyapeeth, Rahuri)
Saraswati Nagar, Panchavati, Nashik- 422 003. Maharashtra
**College Code;11135** **AISHE Code: C-50690**
☎.:(0253)2555221, 2555224 - principal-bscagri@kkwagh.edu.in https://agri-bsc.kkwagh.edu.in

## लांबोटी येथे कृषीदुत स्नेहल ससाणे यांचा अभ्यास दौरा मार्गदर्शन



मोहोळ (प्रतिनिधी): महात्मा फुले कृषी विद्यापीठ आंतर्गत कर्मवीर काकासाहेब वाघ कृषी महाविद्यालय नाशिक येथील कृषीदुत स्नेहल सुनिल ससाणे यांनी कृषी जागरूकता व औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रमाद्वारे मोहोळ तालुक्यातील लांबोटी येथे शेतकरी बांधवाना मार्गदर्शन केले .कृषी जागरुकता या कार्यक्रमाद्वारे प्रबोधन केले व शेती विषयी माहिती दिली .यावेळी गावचे सरपंच पप्पु कदम ग्रामसेवक एन आर महामुनी यांच्या सह शेतकरी बांधव सोशल डीस्टस ठेऊन उपस्थीत होते . यावेळी उपस्थित सरपंच यानी ससाणे यांचे स्वागत केले. सध्या कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव आसल्याने शेतकरी यांच्या प्रत्यक्ष शेतात जाऊन ससाणे यानी ही प्रात्यक्षिके दाखवली तसेच शेती विषयक आनुभव व समस्या जाणुन घेतल्या व त्यावर उपाय सुचविले . आधुनिक शेती तंत्रज्ञान व बी बियाणांची माहिती दिली जैविक खताचा वापर कसा करावा या विषयी मार्गदर्शन केले .

यावेळी शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते . हा कृषी अभ्यास दौरा पुर्ण करण्यासाठी स्नेहल ससाणे यांना कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सतिष हाडोळे, प्रा विक्रम कोरडे,प्रा तुषार उगले ,प्रा परमेश्वरी पवार यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले या कार्यक्रमा आंतर्गत उपयुक्त माहिती मिळाल्याने शेतकरी समाधानी झाले .

**News of RAWE Activity published in daily Newspaper.**

सकाळ.

## गोरमाळे येथे शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**मळेगाव :** बार्शी तालुक्यातील गोरमाळे येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ अंतर्गत कर्मवीर काकासाहेब वाघ कृषी महाविदयालय, नाशिक यांच्या वतीने कृषी जागरुकता व औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रमाद्बारे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. कृषीदूत सौरभ गाडे, आकाश आखाडे, नारायण शेळके, पृथ्वीराज मस्के यांनी कृषी जागरुकता कार्यक्रम २०२० च्या अभ्यास दौऱ्यात गोरमाळे येथे झिरो एनर्जी कुलिंग चेंबर विषयी प्रात्यक्षिकाद्बारे शेतकऱ्यांना माहिती दिली. कृषी दूतांना प्राचार्य डॉ. सतिश हाडोळे, प्रा. परमेश्वरी पवार, तुषार उगले, विक्रम कोरडे यांचे मार्गदर्शन लाभले. नारायण शेळके यांनी सर्वांचे आभार मानले.

**News of RAWE Activity published in daily Newspaper.**

K. K. Wagh Education Society's

**K. K. Wagh College of Agriculture,**

(Affiliated to Mahatma Phule Krishi Vidyapeeth, Rahuri)

Saraswati Nagar, Panchavati, Nashik- 422 003. Maharashtra

**College Code;11135** **AISHE Code: C-50690**

☎.:(0253)2555221, 2555224 - principal-bscagri@kkwagh.edu.in https://agri-bsc.kkwagh.edu.in



# कृषी दूतांचे शेतकऱ्यांना झिरो एनर्जी कुलिंग चेंबर विषयी मार्गदर्शन

परंडा दि २६ (प्रतिनिधी)

महात्मा फुले कृषी विदयापीठा अंतर्गत कर्मवीर काकासाहेब वाघ कृषी महाविदयालय नाशिक येथील कृषीदूत सौरभ गाडे , आकाश आखाडे , नारायण शेळ्के ,पृथ्वीराज मस्के ,यांनी कृषी जागृकता व औ दयोगिक , कार्यानुभव कार्यकमाद्वारे बार्शी तालुक्यातील गोरमाळा येथील शेतकरी बांधवाना मार्गदर्शन केले. कृषी जागृकता या कार्यकमादवारे झिरो एनर्जी कुलिंग चेंबर विषयी प्रात्यक्षिक करून माहिती देण्यात आली .

नैसर्गिक संसाधनाचा वापर करुन कृषी मालाची गुणवता व जास्त वेळ साठवण क्षमता वाढवू शकतो या विषयी मार्गदर्शन केले . यावेळी शेतकरी अनुरुध शेळके . अनंता शेळके , गणेश मोरे, आदि शेतकरी . ग्रामस्थ उपस्थित होते . हा कृषी अभ्यास दौरा , पूर्ण करण्यासाठी कृषी दूतांना कृषी महाविदयालयाचे .प्राचार्य डॉ . सतिश हाडोळे , व प्रा.परमेश्वरी पवार तुषार डगले, विक्रम कोरडे , यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले . या कार्यक्रमामुळे उपयुक्त माहिती मिळाल्याने शेतकरी समाधानी झाले.

शेवटी कृषी दूत नारायण शेळके यांनी सर्वाचे आभार मानले

News of RAWE Activity published in daily Newspaper.



# आधुनिक पध्दतीने शेतमालाची साठवणूक करा

## कृषी पदवीच्या विद्यार्थ्यांचा उपक्रम

संचार वृत्तसेवा

परंडा, दि. २७- शेतात पिकणाऱ्या वेगवेगळ्या धान्य आणि अन्य प्रकारच्या शेतमालाच्या साठवणीच्या योग्य पध्दती आणि त्यावरील खर्चात कशी कपात करावयाची, याबाबत कृषी पदवीच्या विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी 'झिरो एनर्जी कुलिंग चेंबर विषयी प्रात्यक्षिकही शेतकऱ्यांना दाखविण्यात आले.

महात्मा फुले कृषी विद्यापीठाअंतर्गत नाशिक येथील कर्मवीर काकासाहेब वाघ कृषी महाविद्यालयातील कृषिदूत सौरभ गाडे, आकाश आखाडे, नारायण शेळ्के, पृथ्वीराज मस्के यांनी कृषी जागरूकता व औद्योगिक, कार्यानुभव कार्यक्रमाद्वारे बार्शी तालुक्यातील गोरमाळा येथील शेतकरी बांधवांना मार्गदर्शन केले. कृषी जागरूकता या कार्यक्रमाद्वारे झिरो एनर्जी कुलिंग चेंबरविषयी प्रात्यक्षिक करून माहिती देण्यात आली. नैसर्गिक संसाधनाचा वापर करून कृषी मालाची गुणवता व जास्त वेळ साठवण क्षमता वाढवू शकतो, याविषयी मार्गदर्शन केले.

यावेळी शेतकरी अनिरूध्द शेळके, अनंता शेळके, गणेश मोरे व अन्य शेतकरी ग्रामस्थ उपस्थित होते. हा कृषी अभ्यास दौरा पूर्ण करण्यासाठी कृषिदूतांना कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश हाडोळे, प्रा. परमेश्वरी पवार, तुषार डगले, विक्रम कोरडे यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. या कार्यक्रमामुळे उपयुक्त माहिती मिळाल्याने शेतकरी समाधानी झाले. शेवटी कृषिदूत नारायण शेळके यांनी उपस्थितांचे आभार मानले.

News of RAWE Activity published in daily Newspaper.

K. K. Wagh Education Society's

**K. K. Wagh College of Agriculture,**

(Affiliated to Mahatma Phule Krishi Vidyapeeth, Rahuri)

Saraswati Nagar, Panchavati, Nashik- 422 003. Maharashtra

**College Code;11135** **AISHE Code: C-50690**

.:(0253)2555221, 2555224 - principal-bscagri@kkwagh.edu.in https://agri-bsc.kkwagh.edu.in

**लोकमंथन**

## आहेरगावला शेतकऱ्यांना कीटकनाशके हाताळणी वर मार्गदर्शन

के.के.वाघ कृषि महाविद्यालयाचा अभिनव उपक्रम




**निफाड/प्रतिनिधी**

तालुक्यातील आहेरगाव मध्ये के.के.वाघ कृषि महाविद्यालयातील कृषिदुत घंगाळे ऋतुजा शिवाजी यांच्यामार्फत कीटकनाशके, रसायनाच्या हाताळणी बाबत मार्गदर्शनपर कार्यशाळा आयोजित करण्यात आली. दैनंदिन जीवनात शेतकरी मित्रांच्या रसायने हाताळताना सुरक्षिततेवर भर देण्याच्या दृष्टीकोनातून हे प्रत्याक्षिक आयोजित करण्यात आले. या प्रसंगी घंगाळे ऋतुजा शिवाजी या कृषिदूतने प्रत्याक्षिक घेतले. यावेळी शेतकरी ग्रामस्थांना कीटकनाशकाच्या विषजन्यतेच्या श्रेणीची ओळख करून देण्यात आली. संरक्षण कापडाच्या वापराचे महत्व प्रात्याक्षिकद्वारे सांगून कीटकनाशकांच्या फवारणी दरम्यान सुरक्षित हाताळणीचे महत्व पटवून देण्यात आले व त्याच्या वापरास प्रोत्साहन देण्याचे काम कृषिदूतने केले. कीटकनाशकांची सुरक्षित साठवण, माहीत पुस्तिकेचा योग्य वापर, विविध मिश्रणाची योग्यता, वापरानंतर रिकाम्या डब्यांची विल्हेवाट तसेच अपघताने विषबाधा झाल्यास प्रथोमपचार कसे करावेत याबाबत विस्तृत मार्गदर्शन करण्यात आले. सुरक्षित हाताळणी व निरोगी जीवन हे समीकरण पटवून देण्यात आले. याबाबत कृषिदूतला प्रा.तुषार उगले, प्रा परी पवार आणि प्राचार्य डॉ स हाडोळे यांचे मार्गदर्शन लाभले. ग्रामस्थांनी व उपस्थित शेतकऱ्यांनी या कार्यक्रमास प्रतिसाद दर्शवला.

**News of RAWE Activity published in daily Newspaper.**

**पुण्यनगरी**

## कृषिकन्येकडून किटकनाशके हाताळणीवर मार्गदर्शन


चांदोरी : निफाड तालुक्यातील आहेरगाव येथे के. के. वाघ कृषी महाविद्यालयातील कृषिकन्या ऋतुजा घंगाळे हिने कीटकनाशके, रसायनाच्या हाताळणी बाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. दैनंदिन जीवनात रसायने हाताळताना सुरक्षिततेवर भर देण्याच्या दृष्टीकोनातून हे प्रत्याक्षिक आयोजित करण्यात आले. याप्रसंगी ऋतुजा घंगाळे हिने प्रत्याक्षिक घेतले. शेतकरी ग्रामस्थांना कीटकनाशकाच्या विषजन्यतेच्या श्रेणीची ओळख करून दिली. संरक्षण कापडाच्या वापराचे महत्व प्रात्याक्षिकद्वारे सांगून कीटकनाशकांच्या फवारणी दरम्यान सुरक्षित हाताळणीचे महत्व पटवून दिले व त्याच्या वापरास प्रोत्साहन देण्याचे आवाहन केले. कीटकनाशकांची सुरक्षित साठवण, माहिती पुस्तिकेचा योग्य वापर, विविध मिश्रणाची योग्यता, वापरानंतर रिकाम्या डब्यांची विल्हेवाट तसेच अपघताने विषबाधा झाल्यास प्रथोमपचार कसे करावेत याबाबत विस्तृत मार्गदर्शन करण्यात आले. सुरक्षित हाताळणी व निरोगी जीवन हे समीकरण पटवून देण्यात आले. घंगाळे हिला प्रा. तुषार उगले, प्रा. परमेश्वरी पवार आणि प्राचार्य डॉ. सतीश हाडोळे यांचे मार्गदर्शन लाभले.

**News of RAWE Activity published in daily Newspaper.**

# NEWS Gallery 2019-20

गांवकरी
■ नाशिक, बुधवार, दि. १७ जुलै २०१९

## लोणवाडीला माहिती कार्यशाळेचे उदघाटन



लोणवाडी तालुका निफाड येथे आधुनिक तंत्रज्ञान कार्यशाळेचे उद्घाटन करताना सरपंच सुभाष चोपडे, प्रा परमेश्वरी पवार, उपसरपंच माणिकराव चोपडे, तलाठी अमोल निकुंभ , माणिक दौंड गोकूळ दौंड सागर चोपडे बाळासाहेब गरुड आदींचे कृषिदूत सर्वश्री प्रफुल शिरसाठ हर्षल आवारे यज्ञेश पानगव्हाणे व कृषिदूत.

। वनसगाव । वार्ताहर ।
के.के.वाघ शिक्षण संस्था संचलित, के.के.वाघ कृषी महाविद्यालय नाशिक येथील ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रम अंतर्गत कृषीदुतानी लोणवाडी ता. निफाड येथे विविध कार्यशाळाचे आयोजन करुन येथील शेतकरी बांधवांना शेती विषयक विविध उपक्रम राबवत आधुनिक शेती तंत्र व सेंद्रिय शेती विषयक माहिती कार्यशाळेचे उदघाटन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे उदघाटन लोणवाडी येथील सरपंच मा.श्री. सुभाष चोपडे यांनी केले.या प्रसंगी के.के.वाघ कृषी महाविद्यालयाच्या प्रा.परमेश्वरी पवार,उप सरपंच माणिकराव चोपडे,तलाठी अमोल निकुंभ, लोणवाडी येथील युवा शेतकरी तसेच प्रगतशील शेतकरी माणिकदौंड,गोकुळदौंड,बाळासाहेब गरूड,दिलीप जाधव,श्रीराम पाटील,सागर चोपडे व इतर ग्रामस्थ उपस्थित होते. या वेळी के.के. वाघ कृषी महाविद्यालयाचे कृषिदूत प्रफुल्ल शिरसाठ, तुषार शिंदे, यज्ञेश पानगव्हाणे, मयूर शिंदे , हर्षल आवारे , आकाश लाळगे,सूर्यप्रताप कोरे यांनी माहिती दिली. या कृषी दुतांना मार्गदर्शन म्हणुन प्रा.तुषार उगले,प्रा.परमेश्वरी पवार, प्रा.विक्रम कोरडे, प्रा.नेहल भोकनळ यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृषिदूत प्रफुल्ल शिरसाट यांनी केले तर उपस्थितांचे आभार यज्ञेश पानगव्हाणे यांनी मांनले.

सकाळ अॅग्रोवन बुधवार, ३१ जुलै २०१९

## लष्करी अळीविषयी कृषिदूतांकडून मार्गदर्शन

**नाशिक (प्रतिनिधी) :** मक्यावर अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव वाढला आहे. दरम्यान, कर्मवीर काकासाहेब वाघ कृषी महाविद्यालयातील कृषिदूतांनी चांदवड तालुक्यातील धोंडगव्हाण येथे लष्करी अळीच्या प्रसार आणि व्यवस्थापनाविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

लष्करी अळीची ओळख, अळीचा जीवनक्रम व अवस्था यांबद्दल कृषिदूतांनी अळीच्या प्रत्येक स्तरावरील नुकसानीचे विस्तृत मार्गदर्शन केले. लष्करी अळीचा प्रसार रोखण्यासाठी एकात्मिक व्यवस्थापन याबाबत कृषिदूतांनी परिपत्रकांचे वाटप केले. यांसह जमिनीची खोल नांगरट, वेळेवर पेरणी, पेरणीनंतर लगेच एकरी दहा पक्षी थांबे उभे करणे, एकरी एक या प्रमाणात प्रकाश सापळे शेतामध्ये लावणे, मक्याभोवती नेपियरसारख्या सापळा पिकाची पेरणी, २-३ मिलि प्रति लिटर निंबोळी तेलाची फवारणी तसेच कामगंध सापळ्यांचा वापर व नियंत्रणासाठी वापरात येणाऱ्या कीटकनाशकांचा वापर हे पर्याय सुचविले.



**धोंड गव्हाण, ता. चांदवड : लष्करी अळीबाबत उपाययोजना याबाबत माहिती देताना कृषिदूत.**

कार्यक्रमासाठी प्रा. टी. बी. उगले, प्रा. पी. बी. पवार, प्रा. व्ही. सी. कोरडे, प्रा. एन. बी. भोकनळ यांचे मार्गदर्शन लाभले. कृषिदूत अभिजित विधाते, प्रकाश बेलकर, अक्षय झुटिंग, चेतन पवार, यशराज साळवे, मनोज सोनोने यांचा सहभाग होता.

K. K. Wagh Education Society's
**K. K. Wagh College of Agriculture,**
(Affiliated to Mahatma Phule Krishi Vidyapeeth, Rahuri)
Saraswati Nagar, Panchavati, Nashik- 422 003. Maharashtra
**College Code;11135** **AISHE Code: C-50690**

.:(0253)2555221, 2555224 - principal-bscagri@kkwagh.edu.in https://agri-bsc.kkwagh.edu.in



गांवकरी

जिल्हा विशेष | ■ नाशिक, शुक्रवार, दि. २८ जून २०१९ | 2

## पंचकेश्वर येथे के.के.वाघ कृषी महाविद्यालयात कृषिदूतांचे आगमन

। पंचवटी । वार्ताहर । पंचकेश्वर,ता निफाड येथे ग्रामीण कृषि कार्यानुभव कार्यक्रमासाठी कृषिदुत आले असून ग्रामस्थांनी त्यांचे सहर्ष स्वागत केले. याप्रसंगी सरपंच, ग्राम विकास अधिकारी तसेच इतर कर्मचारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते. कृषीक्षेत्राशी संलग्नित कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एम.हाडोळे, प्रा.टी. बी. उगले, प्रा.पी. बी. पवार, प्रा. एन. बी. भोकनाळ, प्रा. व्हि. सी. कोरडे यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहेत. ग्रामीण कृषि कार्यानुभव अंतर्गत शेतातील विविध समस्या व निरसन मातीपानी परीक्षण,जल संवर्धन, बीज प्रक्रिया व विविध नवीन शेती विषयक संकल्पना यावर शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत. निकम, सुशांत होडगर, ऋषिप्रसाद वाघ, देसले, विष्णू इल्वे, घुगे आदी कृषिदुत उपस्थित होते.



उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

गांवकरी

जिल्हा विशेष | 4

## कृषिदूतांतर्फे मातीपरीक्षणाची कार्यशाळा

। नाशिक । वार्ताहर । पंचकेश्वर गावात कृषिदूतांकडून माती परिक्षणाची कार्यशाळा घेण्यात आली. शेतातील माती परीक्षणासाठी मातीचे नमुने कसे घ्यावचे माती परिक्षणाचे फायदे काय, माती परीक्षणाने आपल्या शेतातील अन्नद्रव्यांची कमतरता कशी भरून काढता येऊ शकते व आपले उत्पन्न कसे वाढवता येऊ शकते याचे महत्व कृषिदूतांनी शेतकऱ्यांना पटवून दिले.याप्रसंगी शेतकऱ्यांना क. का. वाघ कृषी महाविद्यालयाच्या उप प्राचार्य. प्रो.पी.व्ही.शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच क. का. वाघ कृषी महाविद्यालयाचे कृषिदूत ऋषिकेश निकम, प्रशांत देसले, सुशांत होडगर, ऋषिप्रसाद वाघ, विष्णू इल्वे, सचिन घुगे. यांनी प्रात्यक्षिक व माहिती दिली.



उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

गांवकरी

जिल्हा विशेष | 4

## पंचकेश्वर गावात राबवली कृषिदूतांनी कार्यशाळा

। पंचवटी । वार्ताहर । क.का.वाघ शिक्षण संस्था संचलित, क.का. वाघ कृषी महाविद्यालय नाशिक येथील ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रम अंतर्गत कृषीदुतांनी पंचकेश्वर ता. निफाड येथे विविध कार्यशाळाचे आयोजन करुन येथील शेतकरी बांधवांना गावात असणाऱ्या शेती उपयोगी उपकरणे व विविध गावातील सुविधांचे गावात नकाशे काढून कृषीदूतांनी पंचकेश्वर येथील ग्रामस्थांना दाखवले व त्याविषयी मार्गदर्शन केले.

या प्रसंगी गावातील भिमाजी रहाणे,सोमनाथ लोखंडे, बाळासाहेब रहाणे,भानुदास लोखंडे,दशरथ ढोमसे इ. ग्रामस्थ उपस्थित होते. या वेळी क.का.वाघ कृषी महाविद्यालयाचे कृषिदूत ऋषिकेश निकम,प्रशांत देसले,सुशांत होडगर, ऋषिप्रसाद वाघ,सचिन घुगे,विष्णू इल्वे यांनी ग्रामस्थांना माहिती दिली. मार्गदर्शन म्हणुन क.का.वाघ कृषिमहाविद्यालयाचे प्राचार्य. प्रा.सतिश हाडोळे, प्रा.तुषार उगले,प्रा.परमेश्वरी पवार, प्रा.विक्रम कोरडे, प्रा.नेहा भोकनळ यांनी मार्गदर्शन केले.



गांवकरी ■ नाशिक, सोमवार, दि. २४ जून २०१९ | 4

## खेडेला कॉलेज-व्हिलेज-नॉलेज सत्र

। पंचवटी । वार्ताहर । नाशिक येथील के.के.वाघ कृषी महाविद्यालयातील कृषीदूतांचे खेडे ( निफाड )येथे ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमासाठी आगमन झाले असून परिसरातील शेतकरी ग्रामस्थांनी त्यांचे उत्स्फूर्तपणे स्वागत केले. याप्रसंगी सरपंच सौ.निर्मला आहिरे, उपसरपंच सतीश कोल्हे, ग्रामसेवक तानाजी कुशारे तसेच इतर प्रगतशील शेतकरी व ग्रामस्थ आदी उपस्थित होते.

ग्रामीण कृषी कार्यानुभव अंतर्गत शेतकऱ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाची माहिती, माती-पाणी परीक्षण, एकात्मिक कीड-रोग व्यवस्थापन, जनावरांचे संगोपन तसेच शेतकरी मित्रांच्या दैनंदिन जीवनातील समस्या व उपाय तसेच गावपातळीवर जल संधारण, वृक्षारोपण, तण व्यवस्थापन, कृषी विस्तार आदी विषयांवर मार्गदर्शनपर कार्यक्रमांचे नियोजन करून सखोल विश्लेषण या कृषीदूतांकडून करण्यात येणार आहे. यामध्ये प्रामुख्याने संकेत कावळे, शुभम पालखेडे, अक्षय जाधव, देवेंद्र ढेंडे आणि हितेश पाटिल या कृषिदूतांचा समावेश आहे. कृषी शिक्षण व कृषी विस्तार यांची उत्तम सांगड घालण्याकरीता ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रम महत्वाची भूमिका बजावतो. कृषीक्षेत्राशी संबंधित कार्यानुभव कार्यक्रम हा प्राचार्य डॉ. एस.एम. हाडोळे, प्रा. टी.बी. उगले, प्रा.पी.बी. पवार, प्रा. एन.बी. भोकनळ, प्रा.व्ही.सी. कोरडे यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे.

देशदूत
www.deshdoot.com
नाशिक
बुधवार,
दि. ३ जुलै २०१९

## वनसगावला कृषिदिन साजरा

उगाव । वनसगाव येथे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा हरित क्रांतीचे प्रणेते मा. वसंतराव नाईक यांची जयंती कृषिदिन म्हणून साजरी करण्यात आली. कृषिदिनाच्या पार्श्वभूमीवर कृषिदूतांकडून वृक्षदिंडी, वृक्षारोपण व कृषिविषयक माहिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी सरपंच उन्मेश डुंबरे, ग्रामसेवक व्ही.बी. गोल्हार, जि.प. शाळा मुख्याध्यापक आर.एन. कापडणीस, शिक्षकवृंद, शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते. शेतीचे महत्व, शाश्वत उत्पन्न अणि आधुनिकतेची जोड, सेंद्रिय शेतीची आवश्यकता या विषयांवर के.के. वाघ कृषी महाविद्यालयाचे कृषिदूत संकेत कावळे, शुभम पालखेडे, अक्षय जाधव, देवेंद्र उंडे, हितेश पाटिल यांनी शेतकऱ्यांसोबत चर्चा केली. यासाठी प्राचार्य एस.एम. होडोळे, प्रा.टी.बी. उगले, प्रा.व्ही.सी. कोरडे, प्रा.एन.बी. भोकनळ यांचे मार्गदर्शन लाभले. ग्रामस्थांनीही कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद देवून या कार्यक्रमाचे स्वागत केले.

देशदूत
www.deshdoot.com
नाशिक
शनिवार,
दि. १३ जुलै २०१९

## कीटकनाशके हाताळणीवर मार्गदर्शन

उगाव। खेडे येथे के.के. वाघ कृषी महाविद्यालयातील कृषिदूतांमार्फत कीटकनाशके, रसायनांच्या हाताळणीबाबत मार्गदर्शनपर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. दैनंदिन जीवनात शेतकरी मित्रांच्या रसायने हाताळतांना सुरक्षिततेवर भर देण्याच्या दृष्टिकोनातून हे प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी संकेत कावळे, अक्षय जाधव, शुभम पालखेडे, देवेंद्र उंडे, हितेश पाटील या कृषिदूतांनी प्रात्यक्षिक घेतले. यावेळी शेतकरी ग्रामस्थांना कीटकनाशकांच्या विषजन्यतेच्या श्रेणींची ओळख करून दिली. संरक्षण कापडांच्या वापराचे महत्व प्रात्यक्षिकाद्वारे सांगून कीटकनाशकांच्या फवारणीदरम्यान सुरक्षित हाताळणीचे महत्व पटवून देवून त्याच्या वापरास प्रोत्साहन देण्याचे काम कृषिदूतांनी केले आहे. कीटकनाशकांची सुरक्षित साठवण, माहिती पुस्तिकेचा योग्य वापर, विविध मिश्रणांची योग्यता, वापरानंतर रिकाम्या डब्यांची विल्हेवाट तसेच अपघाताने विषबाधा झाल्यास प्रथमोपचार कसे करावेत याबाबत विस्तृत मार्गदर्शन करण्यात आले. सुरक्षित हाताळणी व निरोगी जीवन हे समीकरण पटवून देण्यात आले. याबाबत कृषिदूतांना प्रा.तुषार उगले यांचे मार्गदर्शन लाभले.

गांवकरी
नाशिक, रविवार,
दि. २३ जून २०१९
5

## कृषिदूतांकडून खेडला योगदिन उत्साहात साजरा

पंचवटी । वार्ताहर ।
खेडे (ता.निफाड) येथील जि.प.प्राथमिक शाळेत जागतिक योग दिवस उत्स्फूर्तपणे साजरा करण्यात आला. याप्रसंगी के.के. वाघ कृषी महाविद्यालयातील कृषीदूतांनी विद्यार्थी मित्रांना विविध योगासने व त्यांबाबत मार्गदर्शन केले.

योगाचे फायदे व दैनंदिन जीवनातील आवश्यकता यावर विद्यार्थ्यांशी हितगुज केले. यामध्ये प्रामुख्याने संकेत कावळे, शुभम पालखेडे, अक्षय जाधव, देवेंद्र उंडे व हितेश पाटिल यांचा समावेश होता. तसेच या कार्यक्रमास शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती वाय.बी.बोरसे व श्रीमती आर. एन खताळे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. विविध योगासनांच्या प्रात्यक्षिकांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये योगाविषयी रुची निर्माण करण्यात आली.

योग आणि मानवी आरोग्य यांची उत्तम सांगड ही नक्कीच निरोगी भारताची किल्ली आहे असे महत्त्वही त्यांनी पटवून दिले. तरुणाईमध्ये नियमित व उत्साहाने योग करण्यास योग दिवसाची भूमिका प्रभावशाली ठरते आहे.

बालगोपाळांनीही उत्साहाने या कार्यक्रमाचे समर्थन करून नियमित योग करण्याची प्रतिज्ञा घेतली.

शनिवार, २२ जून २०१९
नाशिक पुढारी
५



## खेडे येथे कृषिदूतांचे आगमन

निफाड : नाशिक येथील के. के. वाघ कृषी महाविद्यालयातील कृषिदूतांचे खेडे येथे ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमासाठी आगमन झाले आहे. याप्रसंगी सरपंच निर्मला आहिरे, उपसरपंच सतीश कोल्हे, ग्रामसेवक तानाजी कुशारे व ग्रामस्थांनी त्यांचे स्वागत केले. संकेत कावळे, शुभम पालखेडे, अक्षय जाधव, देवेंद्र उंडे आणि हितेश पाटील या कृषिदूतांचा समावेश या क्षेत्रभेटीत समावेश आहे. प्राचार्य डॉ. एस. एम. हाडोळे, प्रा. टी. बी. उगले, पी. बी. पवार, एन. बी. भोकनळ, व्ही. सी. कोरडे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभणार आहे.